अतारांकित प्रश्नोत्तरांची १०० वी यादी

महाराष्ट्र विधानसभा

दुसरे अधिवेशन, २०२२

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

नागपूर जिल्ह्यातील मौजा निलडोह व ग्रा.प. सोनेगाव निपानी क्षेत्रातील पट्टे धारकांना शासन निवासी पट्टे देण्याबाबत

(१) ४७८१ (०३-०४-२०२०). श्री.समिर मेघे (हिंगणा) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जागेतील सन १९८० पुर्वीपासून अतिक्रमित निवासी घरे बांधकाम केलेल्या मौजा निलडोह जवळील व ग्रा.प. सोनेगाव निपाणी क्षेत्रातील पट्टे धारकांना शासन निवासी पट्टे देणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अतिक्रमित निवासी धारकानां पट्टे वाटपास मंजूरी देण्यासंबधी लोकप्रतिनिधीनी मा.उद्योग मंत्री यांना दिनांक ६ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पट्टेधारकांना त्वरित कायमपट्टे वाटप करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (१३-०५-२०२२) : (१) म.औ.वि.महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील अतिक्रमीत झोपडपट्टी धारकांबाबत तत्कालीन पालक मंत्र्यांनी दि.०४.०७.२०१६ रोजी झालेल्या सभेत अतिक्रमीत जागेच्या बदल्यात म.औ.वि.महामंडळास शासकीय जमीन देण्याबाबत निर्देश दिले होते.त्यानुसार म.औ.वि.महामंडळाने हिंगणा तालुक्यातील पर्यायी जमीन उपलब्ध करून देण्याबाबत तहसीलदार हिंगणा यांना दि.१८.०७.२०१६ रोजीच्या पत्रान्वये विनंती केली आहे.

म.औ.वि.महामंडळास हिंगणा तालुक्यातील मौ.पोही येथील शासकीय जमीन उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत तसेच म.औ.वि.महामंडळा समवेत संयुक्त स्थळपाहणीसाठी तारीख निश्चित करण्याबाबत उप जिल्हाधिकारी (महसूल) नागपूर, यांनी तहसिलदार, हिंगणा, यांना कळविले असून पुढील कार्यवाही सुरू आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास पर्यायी जमिन उपलब्ध करून देण्याबाबत मौजे पोही येथील शासकीय जमीनीची महसूल विभाग व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचे कडून संयुक्तपणे पाहणी करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात पंतप्रधान सहायता निधीतून प्राप्त झालेले व्हेंटीलेटर्स पूर्ण क्षमतेने वापरण्याबाबत

(२) २७२०० (१६-०६-२०२१). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.टेकचंद सावरकर (कामठी), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाकडून पंतप्रधान सहायता निधीतून राज्यात पुरविण्यात आलेले व्हेंटीलेटर्समध्ये तांत्रिक त्रुटी असल्यामुळे ते वापरण्यात येत नसल्याच्या तक्रारी औरंगाबाद , नागपूर आणि अन्य ठिकाणच्या शासकीय रुग्णालयांकडून करण्यात आल्याचे माहे एप्रिल २०२१ अखेर निदर्शनास आले असून महाराष्ट्राला मिळालेल्या व्हेंटिलेटर पैकी तब्बल २७६ व्हेंटिलेटर बंद असल्याचे व २३९ व्हेंटिलेटर विनावापर असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून हे व्हेंटिलेटर वापरण्यापूर्वी उत्पादक कंपनीकडून प्रशिक्षण घेणे गरजेचे असताना ही, तसे न करता थेट त्याचा वापर सुरू केल्यामुळे तांत्रिक बिघाड होत असल्याचे निदर्शनास आले आहे हे ,खरे आहे काय,
(२) असल्यास, सावंतवाडी (जि. सिंधुदुर्ग) येथील उपजिल्हा रुग्णालयात ऑक्सिजन अभावी तब्बल नऊ व्हेंटिलेटर गेले वर्षभर पुर्णवेळ तंत्रज्ञ व डॉक्टर उपलब्ध नसल्यामुळे कार्यान्वित होऊ शकले नाहीत तसेच गतवर्षी पंतप्रधान सहायता निधतधून दहा व्हेंटिलेटर प्राप्त असुन यातील सहा व्हेंटीलेटर प्रसुती विभागतील एका अडगळीच्या खोलीत विनावापर पडून आहेत तर कोविड केअर सेंटर मध्ये चार व्हेंटीलेटरची व्यवस्था केली परंतु त्यातील दोन व्हेंटिलेटर कार्यान्वित करण्यात आले होते मात्र त्यातील केवळ एकच व्हेंटिलेटर सध्या कार्यान्वित आहे तसेच सावंतवाडी शहरातील एका कोराना रुग्णाची ऑक्सिनची पातळी कमी झाल्याने त्यास उपजिल्हा रुग्णालयाच्या सेंटरमध्ये दाखल केले असता त्याला व्हेंटिलेटरची गरज होती मात्र याठिकाणी व्हेंटिलेटर कार्यान्वित नसल्याने त्यास कार्डियाक ॲम्बुलन्समधून स्वखर्चाने पनवेल येथील खाजगी रुग्णालयात हलविण्यात आले असल्याचे माहे मे,२०२१ च्या पहिल्या आठवडयात वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, भुसावळ शहरातील जळगांव रोडवरील साकेगांव हद्दीत असलेल्या ग्रामीण रुग्णालय व ट्रामा केअर सेंटरला पंतप्रधान सहायता निधीतून माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा

त्यादरम्यान १० व्हेंटिलेटर पुरविण्यांत आले होते परंतु कोराना संसर्गाच्या काळात ते वापरात न आणल्यामुळे बोदवड तालुक्यातील रुग्णासह, एरंडोल तालुक्यातील मौ.कासोदा, यावल तालुक्यातील मौ.न्हावी येथील तिन्ही रुग्णांचा व्हेंटिलेटर सुविधेअभावी मृत्यू झाल्याचे दिनांक १८ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, नागपूर येथील मेयो व मेडीकल या दोन शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय येथे पंतप्रधान सहायता निधी मधून १४० व्हेंटिलेटर तर राज्य शासनाकडून ५० व्हेंटिलेटर उपलब्ध होवूनही यापैकी ४४ व्हेंटिलेटर नादुरूस्त असल्याने रूग्णाची गैरसोय होवून मृत्युचे प्रमाण वाढले असल्याचे दिनांक १३ मे, २०२१ रोजी त्या सुमारास निदर्शनास आले असुन रामटेक उपजिल्हा रूग्णालयास पंतप्रधानसहायता निधीतून प्राप्त झालेले पाच व्हेंटिलेटर कच-यात टाकले असल्याची बाब देखील निदर्शनात आलेली आहे. हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, पालघर जिल्ह्यात कोरोना संसर्गात वाढ होत असताना ऑक्सिजन व व्हेंटिलेटर वेळेवर उपलब्ध नसल्यामुळे मृत्यूदर वाढत असताना देखील पालघरसाठी असलेली १० व्हेंटिलेटर ठाणे जिल्ह्याला देण्यात आल्याची बाब माहे मे, २०२१ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, राज्यात माहे मार्च, २०२० ते एप्रिल, २०२१ अखेर या कालावधीत पंतप्रधान सहायता निधीमधून किती रुग्णालयांना व्हेटीलेटर्स पूरविण्यात आले व त्यातील किती व्हेटीलेंटर्स नादुरुस्त आहेत किंवा किती निकामी असल्याचे निदर्शनास आले आहे,

७.असल्यास, राज्यात ऑक्सीजन अभावी होणारे मृत्यू टाळण्यासाठी तांत्रिक त्रुटींमुळे बंद असलेले किंवा अद्याप विनावापर असलेले व्हेंटिलेटर पूर्ण क्षमतेने वापरण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राजेश टोपे (०८-०६-२०२२) : (१) अंशत: खरे आहे,

केंद्र शासनाकडून पंतप्रधान सहायता निधीतून राज्यात ४७९० व्हेंटीलेटरचा पुरवठा करण्यात आलेला असून, त्यापैकी ४२३६ व्हेंटीलेटर्स कार्यान्वित आहेत. ४९६ व्हेंटीलेटर्स हे नादुरुस्त असून, २६ व्हेंटीलेटर्स महानगरपालिका यांचेकडे स्थलांरीत करण्यात आले व ५ व्हेंटीलेटर्स अकार्यान्वित आहेत. पंतप्रधान सहायता निधीमधून पुरविण्यात आलेल्या काही व्हेंटीलेटर्समध्ये सुरूवातीस तांत्रिक त्रुटी निर्माण झाल्या होत्या. संचालनालय वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्याकडून पाठपुरावाअंती पुरवठादाराकडून त्रुटी दूर करून पुर्ण क्षमतेने व्हेंटीलेटर्स रूग्णांच्या उपचाराकरीता वापरण्यात येत आहेत. तसेच नादुरूस्त असलेले व्हेंटीलेटर्स दुरूस्तीची कार्यवाही संचालनालय वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्या स्तरावर सुरू आहे. उत्पादक / पुरवठादार यांच्याकडून संबंधितास प्रशिक्षण देण्यात आले आहे.

(२) हे अंशत: खरे आहे,

पंतप्रधान सहायता निधीतून दि. ०४.०८.२०२० रोजी ०३ नग व दि. २७.०८.२०२० रोजी ०६ नग असे एकूण ०९ व्हेंटीलेटर प्राप्त झाले. त्याची जोडणी दि. १५.०६.२०२० रोजी करण्यात आली. प्राप्त झालेल्या ०९ व्हेंटीलेटरपैकी ०६ व्हेंटीलेटर आय.सी.यु. मध्ये व ०३ व्हेंटीलेटर हे

डीसीएचसी सेंटर मध्ये कार्यान्वित आहेत. सदर व्हेंटीलेटर हे भिषकतज्ञ व भुलतज्ञ यांचे मार्गदर्शनाखाली कार्यान्वित आहेत. जुना ०१ व्हेंटीलेटर इमर्जन्सी सेवेकरीता साईड रूम मध्ये ठेवण्यात आलेला आहे. उपजिल्हा रूग्णालय, सावंतवाडी येथून कोविड रूग्ण स्थलांतरीत करतांना अत्यवस्थ रूग्ण हे १०८ रूग्णवाहीकेतून संदर्भित केले जातात.

(३) हे खरे नाही,

पुरवठा करण्यात आलेले दहा व्हेंटीलेटर वापरात होते. तसेच व्हेंटीलेटर अभावी रूग्णांचा मृत्यु झालेला नाही. तथापि, तीनही रूग्ण दाखल होतांना त्यांची प्रकृती गंभीर स्वरूपाची होती. त्यामुळे त्यांचा उपचारादरम्यान मृत्यु झाला.

(४) हे खरे नाही,

पंतप्रधान सहायता निधीतून नागपूर येथील इंदिरा गांधी शायकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय येथे १९० व्हेंटीलेटर्स व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर येथे ८५ व्हेंटीलेटर्स प्राप्त झाले आहे. सदरहू व्हेंटीलेटरपैकी ०१ व्हेंटीलेटर नादुरूस्त असून, त्याची दुरूस्ती संचालनालय वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्या स्तरावर सुरू आहे. उर्वरीत व्हेंटीलेटर हे कार्यान्वित आहेत.

उपजिल्हा रूग्णालय, रामटेक येथील पीएम फंडातून प्राप्त झालेले पाच व्हेंटीलेटर हे इंदिरा गांधी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर येथे तात्पुरता तत्वावर वापरण्यासाठी हस्तांतरीत केले आहे. रामटेक तालुक्यातील कोविड-१९ च्या रूग्णांवर डीसीएच/डीसीएचसी स्तरावर सुविधा नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील वैद्यकीय महाविद्यालयातर्फे प्राप्त करून घेतल्या आहेत.

(५) हे अंशत: खरे आहे,

पालघर जिल्ह्यात रूग्णसंख्या कमी प्रमाणात असल्याने ऑक्सीजन व व्हेंटीलेटर पुरेशा प्रमाणात उपलब्ध होते. यास्तव मार्च, २०२० ते एप्रिल, २०२१ अखेर पी.एम. केअर फंडातून पालघर करीता प्राप्त झालेल्या ८९ व्हेंटीलेटर प्राप्त झाले होते. तथापि, कोविड-१९ रूग्णसंख्या पाहता विभागीय स्तरावरून आढावा घेवून प्राप्त व्हेंटीलेटर्सपैकी १५ व्हेंटीलेटरचा पुरवठा कल्याण-डोंबिवली महानगरपालिका व ०५ व्हेंटीलेटरचा पुरवठा अंबरनाथ नगरपरिषद यांना करण्यात आला होता.

(६) पंतप्रधान सहायता निधीमधून अधिनस्त असलेल्या एकूण ३४० रूग्णालयांना एकूण ४७९० व्हेंटीलेटर पुरविण्यात आले. त्यापैकी ४२६३ व्हेंटीलेटर्स कार्यान्वित आहेत. ४९६ व्हेंटीलेटर्स महानगरपालिका यांचेकडे स्थलांतरीत करण्यात आले व ०५ व्हेंटीलेटर्स अकार्यान्वित आहेत. नादुरूस्त व अकार्यान्वित असलेले व्हेंटीलेटर संस्थास्तरावरून दुरूस्त वा कार्यान्वित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(७) बंद असलेल्या व्हेंटीलेटर्सचे दुरूस्तीकरीता पुरवठादार कंपन्यांशी सतत पाठपुरावा करण्यात येत आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय तसेच महानगरपालिका अंतर्गत कोविड रूग्णालयामध्ये व्हेंटीलेटर्स देखभाल / दुरूस्ती करीता बायोमेडीकल इंजिनिअर कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात आले आहेत. तसेच सार्वजनिक आरोग्य संस्थांमध्ये व्हेंटीलेटरची देखभाल दुरूस्ती करिता सेवा पुरावठादाराची नियुक्ती करण्यात आली आहे. पंतप्रधान सहायता निधीतून प्राप्त व्हेंटीलेटर्स पुर्ण क्षमतेने वापरण्यात येत आहेत.

वसई-विरार महानगरपालिका परिवहन सेवेच्या लोकार्पण कार्यक्रमाच्या वेळी पोलीस निरीक्षक यांनी अधिकाराचा दुरुपयोग केल्याबाबत

(३) ३२५४२ (०७-०१-२०२२). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रातील विविध समस्यांबाबत चर्चा करण्यासाठी आयुक्त यांची भेट घेण्यासाठी श्री.अविनाश जाधव, ठाणे पालघर जिल्हाध्यक्ष, मनसे हे मागील सहा महिने पत्रव्यवहार, पाठपुरावा व संपर्क साधून वेळ मागूनही आयुक्ताकडून वेळ देण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ करत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिका परिवहन सेवेच्या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी दिनांक ०५ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास कार्यक्रम स्थळी आयुक्त, वसई-विरार यांच्या निषेध करण्यासाठी आंदोलने व घोषणाबाजी करुन कार्यकर्त्यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ तसेच जबर मारहाण केल्यामुळे पोलिस निरीक्षक राजू कांबळे यांना तत्काळ निलंबित करण्याचे पत्र दिनांक ०७ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास गृहमंत्री, पोलीस आयुक्त, वसई-विरार आदीकडे, कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रतिनिधींनी सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने शासनाने पोलीस निरीक्षक यांच्याविरुद्ध कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (०९-०६-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२) होय

दिनांक ०७ जानेवारी, २०२१ रोजी निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) दिनांक ०५/०१/२०२१ रोजी महानगरपालिकेने आयोजित केलेल्या परिवहन सेवेच्या लोकार्पण सोहळा कार्यक्रम प्रसंगी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांनी अचानक घोषणाबाजी सुरु केल्याने उपस्थित मान्यवरांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता व प्रसंगाचे गांर्भिय ओळखून कडक कारवाई करण्याच्या ओघात व परिस्थिती नियंत्रणात आणण्याच्या ओघात पोलीस निरीक्षक, राजेंद्र गणपत कांबळे (तुळींज पोलीस स्टेशन) यांनी संयम न बाळगता कार्यकर्त्यांना उद्देशून अपशब्द वापरल्याचे आढळून आल्याने त्यांना “ ताकीद ” देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लॉकडाऊनमध्ये अनेक उद्योग, व्यवसाय बंद पडल्यामुळे राज्यातील भूमीपुत्रांना नोकऱ्या गमवाव्या लागल्याबाबत..

(४) ३२६८६ (१२-०१-२०२२). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लॉकडाऊनमध्ये अनेक उद्योग, व्यवसाय बंद पडल्यामुळे

राज्यातील भूमीपुत्रांना नोकऱ्या गमवाव्या लागल्या, अशा भूमीपुत्रांसाठी शासनाने नवीन रोजगार निर्मितीसाठी काही धोरण निश्चित केले आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने काही अंमलबजावणी सुरु झाली आहे का, तसेच बेरोजगाराना नवीन रोजगार निर्मिती करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना करित आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. सुभाष देसाई (१९-०५-२०२२) : (१) व (२) राज्यात नवीन रोजगार निर्मितीसाठी, जिल्हा उद्योग केंद्राच्यामार्फ़त मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना (CMEGP) व पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना (PMEGP) या स्वयंरोजगार योजनांची अंमलबजावणी सुरु आहे. त्याव्दारे स्वयंरोजगारासाठी इच्छुक उमेदवारांना शासनाच्या आर्थिक सहयोगातून उद्योग व्यवसाय उभारणीसाठी, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेअंतर्गत आतापर्यंत २६२४ लाभार्थ्यांना रु.९३.६२ कोटी कर्ज वाटप केले असून, यातून २०९९२ रोजगारांची निर्मिती झाली आहे. तसेच, पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेअंतर्गत एप्रिल, २०२१ ते आतापर्यंत २६३० लाभार्थ्यांना रु.८११९.९५ लाख इतके कर्ज वाटप झाले असून सरासरी २१०४० रोजगारांची निर्मिती झाल्याचे निदर्शनास आले आहे. सदर दोन्ही योजनांना होतकरू युवक/युवतींचा व्यापक प्रतिसाद मिळत असून त्याव्दारे रोजगार व स्वयंरोजगार निर्मितीस मदत होत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

चाकूर (जि. लातूर) येथील वसतिगृहाचे काम सुरू करण्याबाबत

(५) ३३०७७ (१२-०१-२०२२). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ता. चाकूर (जि.लातूर) येथे मुलांचे व मुलींचे वसतिगृह सुरु करण्यात येवून त्यासाठी भाडेतत्वावर जागा घेण्यात आली असून दरमहा लाखो रुपये भाडयापोटी दयावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चाकूर येथील वसतिगृहांच्या इमारती अपुऱ्या पडत असल्यामुळे वसतिगृहाची स्वत:ची इमारत उभारण्यासाठी समाजकल्याण विभागामार्फत कागदोपत्री प्रस्तावाचे केवळ काम चालू असल्याचे दाखविण्यात येऊन प्रत्यक्षात मात्र कोणतीही कार्यवाही सुरु नसल्याचे त्याचसुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने वसतिगृह इमारत बांधकामासाठी यापूर्वीच निधी दिला असतांनाही समाजकल्याण विभागाचे स्थानिक अधिकारी मात्र जिल्हा मध्यवर्ती बँकेशेजारी शासकीय जागा असतांना त्याची मागणी करण्याऐवजी भाडेतत्वावरील जागेस अनुकूल असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने वसतिगृह इमारतीसाठी निधी देऊनही इमारत बांधकाम सुरु करण्यात न आल्याबाबत शासनाने याप्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. धनंजय मुंडे (२८-०४-२०२२) : (१) होय.
(२) नाही. मुलांचे व मुलींचे शासकीय वसतिगृह चाकूर या वसतिगृहांच्या इमारत बांधकामासाठी जमीन उपलब्ध करून घेण्यासाठी सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण कार्यालयाकडून वेळोवेळी आवश्यक कार्यवाही करण्यात आलेली असून, जमीन उपलब्ध करून घेण्यासाठी दि.२५.१.२०१९ व दि.५.६.२०२१ रोजी दैनिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने सहायक आयुक्त, समाजकल्याण कार्यालयास प्राप्त झालेल्या प्रस्तावित जागेची संयुक्त पाहणी करण्यात आलेली असून जमीन वसतिगृह इमारत बांधकामासाठी योग्य असल्याचे समितीकडून ठरविण्यात आलेले आहे.
(३) नाही. तहसिलदार चाकूर यांनी चाकूर शहरालगत किंवा १ कि.मी. च्या हद्दीत १ हेक्टर २० आर इतकी शासकीय जमीन उपलब्ध नसल्याचे दि.२.१.२०१९ च्या पत्रान्वये सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, लातूर कार्यालयास कळविले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

रत्नागिरी जिल्हा कृषि उत्पन्न बाजार समितीचे विभाजन करण्याबाबत

(६) ३३२८१ (१२-०१-२०२२). श्री.योगेशदादा कदम (दापोली) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१).रत्नागिरी जिल्हा कृषि उत्पन्न्न बाजार समितीचे विभाजन करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधि / ग्रामस्थ सातत्याने शासनाकडे करित आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रत्नागिरी जिल्हा कृषि उत्पन्न बाजार समितीचे विभाजन करण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(४).नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२४-०५-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
मा.श्री.योगेश रामदास कदम, विधानसभा सदस्य यांनी दि.०८.०९.२०२० रोजीच्या पत्रान्वये दापोली-खेड-मंडणगड यांनी रत्नागिरी जिल्हा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या विभाजनाबाबत शासनास निवेदन दिले आहे.
(२) रत्नागिरी जिल्हा कृषि उत्पन्न बाजार समितीचे विभाजनाबाबत शासनाच्या दि.१४.१०.२०२० च्या पत्रान्वये पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रत्नागिरी यांना सविस्तर मुद्देनिहाय चौकशी करून अभिप्राय/माहिती शासनास सादर करण्यास कळविले होते. त्यानुषंगाने पणन संचालक यांनी दि.१८.०१.२०२१ रोजी कृषि उत्पन्न बाजार समितीचे विभाजनाबाबतचा प्रस्ताव कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे अभिप्रायाकरीता पाठविण्यात आले होते. याबाबत कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि.१८.०५.२०२१ व दि.२२.०६.२०२१ रोजीच्या पत्रान्वये विभाजनाच्या प्रस्तावामध्ये त्रुटी असल्याने त्याची पूर्तता करणे आवश्यक असल्याचे रत्नागिरी कृषि उत्पन्न बाजार समितीस

कळविले आहे. रत्नागिरी जिल्हा कृषि उत्पन्न बाजार समितीचे विभाजनासाठी वैधानिक लेखापरिक्षण पूर्ण करणे आवश्यक असल्यामुळे बाजार समितीचे सन २०१९-२० व २०२०-२१ या कालावधीचे वैधानिक लेखापरिक्षणाची कार्यवाही सुरू आहे. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून त्रुटींची पूर्तता करून आवश्यक माहितीसह विभाजनाचा परिपुर्ण प्रस्ताव शासनाकडे सादर केल्यानंतर महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ व नियम १९६७ मधील तरतूदीनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

ता.बोदवड (जि.जळगाव) येथील कृषि उत्पन्न बाजार समिती संचालक मंडळाच्या मनमानी कारभाराबाबत

(७) ३३३२९ (१२-०१-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ता.बोदवड येथील कृषि उत्पन्न बाजार समिती संचालक मंडळाच्या मनमानी कारभाराबाबत सचिव, सहकार व पणन विभाग, यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.८ जुलै, २०२१ रोजी लेखी निवदेनाद्वारे चौकशी करण्याची मागणी केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणीती चौकशी केली व चौकशीत काय आढळून आले,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२९-०४-२०२२) : (१) हे अशंत: खरे आहे.
बोदवड येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमधील संचालक मंडळाच्या मनमानी कारभाराबाबत मा.श्री.चंद्रकांत पाटील, विधानसभा सदस्य यांनी दि.०२.०७.२०२१ रोजी प्रधान सचिव, सहकार व पणन विभागास लेखी निवेदन दिले आहे.
(२) सदर लेखी निवेदनाच्या अनुषंगाने सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, बोदवड यांनी दिनांक २० डिसेंबर, २०२१ रोजी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगांव यांना चौकशी अहवाल सादर केला असून सदर अहवालामध्ये बाजार समिती विरूध्द कोणतीही कारवाई करण्यासारखी बाब आढळून आलेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

बोदवड (जि.जळगांव) येथील तहसिलदार व पोलिस निरिक्षक यांचेवर शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबत

(८) ३३३३७ (०७-०१-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोदवड (जि.जळगांव) येथील तहसिलदार व पोलीस निरीक्षक यांचेवर शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबत मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवदेनाद्वारे मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) तसेच पोलीस निरिक्षक, श्री.गायकवाड यांच्या मनमानी कारभाराची तात्काळ चौकशी करुन कारवाई होण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी गृह मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक ६ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त लेखी निवेदनाच्या मागणीनुसार पोलीस निरिक्षक यांची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,
(४) असल्यास, चौकशीनुसार संबंधित पोलीस निरिक्षकावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (१३-०६-२०२२) : (१) व (२) लेखी निवेदने प्राप्त झाली आहेत, हे खरे आहे.
(३) प्रश्न भाग-१ व २ मध्ये नमूद मा. लोकप्रतिनिधी यांच्या दिनांक ०६ जुलै, २०२१ आणि दिनांक ०६ मे, २०२१ रोजीच्या निवेदनांची अनुक्रमे उपविभागीय पोलीस अधिकारी, मुक्ताईनगर उपविभाग, जळगांव आणि उपविभागीय पोलीस अधिकारी, फैजपूर उपविभाग, फैजपूर यांचे स्तरावर चौकशी करण्यात आली. एकंदरीत दोन्ही निवेदनाच्या चौकशीअंती संबंधित पोलीस निरीक्षक यांचे विरुद्ध काही निष्पन्न झाले नाही. सद्यस्थितीत श्री.गायकवाड पोलीस निरीक्षक यांची जिल्हा बदली अंतर्गत दिनांक १९.०१.२०२२ रोजीच्या आदेशान्वये बोदवड पोलीस स्टेशन ते भुसावळ बाजारपेठ पोलीस स्टेशन अशी बदली करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

परभणी जिल्ह्यात पूर्णा कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत.

(९) ३३३७८ (१२-०१-२०२२). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यात पूर्णा कृषी उत्पन्न बाजार समितीची जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१ व त्रिसदस्यीय समिती यांनी बाजार समितीच्या गैरव्यवहारांची चौकशी करून सभापती व संचालक मंडळावर दोन्ही चौकशीमध्ये ठपका ठेवला असल्याने त्याच अनुषंगाने अधिनियम १९६३ चे कलम ४५ अन्वये जिल्हा उपनिबंधक यांनी बाजार समितीच्या संचालक मंडळाला नोटीस बजावली असल्याचे ऑक्टोबर २०२१ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय?
(२) असल्यास कृषी उत्पन्न बाजार समिती पूर्णाच्या सभापती व संचालक मंडळाने बेकायदेशीर नोकरभरती भूखंड वाटप तसेच सभापती यांनी स्वतःच्या कुटुंबातील वडील मूले व पत्नी आणि नातेवाईक मित्र यांच्या नावाने पदाचा दुरुपयोग करून बाजार समितीचे रिकामे भूखंड बेकायदेशीररित्या नावावर करून घेतले व त्याचबरोबर याच सभापती व संचालक मंडळाने ३६ रिकामे भूखंड बेकायदेशीरपणे हडप करून बाजार समितीची आर्थिक लूट करून गैरव्यवहार केला असल्याचे समजते हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास शासनाकडून संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे कोणती?

श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (३१-०५-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

पूर्णा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या गैरव्यवहारांबाबत त्रिसदस्यीय समिती यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालाच्या अनुषंगाने जिल्हा निबंधक, सहकारी संस्था, परभणी यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती, पुर्णा, जि.परभणी येथील सभापती, सचिव व संचालक यांना दि.१०.०८.२०२० च्या पत्रान्वये महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन), १९६३ चे कलम ४५ कारणे दाखवा नोटीस निर्गमित केली आहे.

(२) कृषि उत्पन्न बाजार समिती, पुर्णा यांनी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन), अधिनियम, १९६३ चे कलम १२ अन्वये अटी व शर्तींच्या अधीन राहून बाजार समितीच्या आवारालगतच्या ३८ रिकामे प्लॉट जाहीर लिलावाद्वारे रेडीरेकनर दरापेक्षा जास्तीत जास्त दराने बोली बोलणाऱ्या अनुज्ञप्तीधारकांना ३० वर्षाच्या मुदतीवर भाडेपट्टाने लिज देण्याकरीता स्थानिक वृत्तपत्रात जाहीर सुचना प्रसिध्द केलेली होती. त्रिसदस्यीय समिती यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालाच्या अनुषंगाने कृषि उत्पन्न बाजार समिती, पुर्णा यांनी प्रसिध्द केलेल्या जाहीर सूचनेमधील नमुद अटीचे व बाजार समितीच्या संचालक मंडळ सभेतील ठरावाचे स्पष्टपणे उल्लंघन झाल्याचे दिसून येते.

(३) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, परभणी यांच्या दि.०८.११.२०२१ पत्रान्वये महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन), १९६३ चे कलम ४० व त्याखालील नियम १९६७ चे नियम ११७ मधील तरतूदीनुसार विशेष लेखा परिक्षक, वर्ग-१ (फिरते पथक), सहकारी संस्था, औरंगाबाद यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती, पूर्णाच्या अभिलेखाची वस्तुस्थिती दर्शक पाहणी करून फेरचौकशी अहवाल सादर करण्याबाबत कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

नायगाव (जि.नांदेड) विधानसभा मतदार संघातील नायगाव पोलीस स्टेशनात कर्मचाऱ्यांची लोकसंख्या कमी असल्याबाबत

(१०) ३३६५० (०७-०१-२०२२). श्री.राजेश पवार (नायगांव) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नायगाव (जि.नांदेड) मतदार संघामध्ये नायगाव पोलीस स्टेशनच्या हद्दीत मोठ्या प्रमाणात लोकसंख्या असून पोलीस स्टेशनच्या हद्दीचे कार्यक्षेत्र मोठे असून त्यामुळे संबधित पोलीस स्टेशन मधील अपुरे कर्मचारी असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे एवढ्या मोठ्या कार्यक्षेत्रात गुन्हेगारीवर लक्ष ठेवणे पोलीसांना अवघड जात आहे, हे ही खर आहे काय,

(३) असल्यास, यासाठी स्थानिक नागरीकांची मांजरम या गावी नवीन पोलीस स्टेशनची मागणी खूप दिवसांपासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणीच्या मागणीबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (१३-०६-२०२२) : (१) व (२) नाही.
पोलीस ठाणे, नायगांव येथे पुरेशा प्रमाणात मनुष्यबळ उपलब्ध असून, गुन्हेगारीवर लक्ष ठेवणे पोलीसांना अवघड जात नाही.
(३) व (४) पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी दि.२५/१/२०२० च्या पत्राव्दारे नायगांव पोलीस ठाणेचे विभाजन करून मांजरम पोलीस ठाणे निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयास सादर केले असता, प्रस्तावित पोलीस ठाणेच्या हद्दीतील मागील ३ वर्षात घडलेल्या भाग १ ते ५ मधील गुन्हयांची सरासरी १५० पेक्षा कमी असल्याने, मांजरम येथे नवीन पोलीस ठाणे निर्माण करणे उचित होणार नसल्याचे पोलीस महासंचालक कार्यालयाने पोलीस अधीक्षक, नांदेड यांना कळविलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

धर्माबाद (जि.नांदेड) येथे मुख्य बाजारपेठ व औदयोगिक वसाहत उभारण्याबाबत

(११) ३३६५३ (१२-०१-२०२२). श्री.राजेश पवार (नायगांव) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धर्माबाद ही बाजारपेठ महाराष्ट्र- तेलंगणा राज्य सीमेवर असल्याने तेलंगना परिसरातून अनेक शेतकरी आपला शेतमाल विकण्यासाठी येत असून धर्माबाद येथे मुख्य बाजारपेठ उभारण्यात येत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धर्माबाद शहर मिरची साठी प्रसिद्ध असून हळद व तंबाखु यासारख्या अनेक पिकांचे उत्पन्न या ठिकाणी मोठ्या प्रमाणात होत असून या पिंकावर उत्पादन प्रक्रिया होण्याची गरज आहे यासाठी भव्य अशा प्रकारची सुसज्ज औद्योगिक वसाहत उभारणे आवश्यक आहे, हे ही खर आहे का,
(३) असल्यास, उक्तप्रकरणी शासनाने चौकशी करून बाजारपेठ व औद्योगिक वसाहत उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२९-०४-२०२२) : (१) हे अशंत खरे आहे.
नांदेड जिल्हातील धर्माबाद ही बाजारपेठ महाराष्ट्र तेलंगणा राज्य सीमेवर असल्याने तेलंगणा परिसरातून अनेक शेतकरी आपला शेतमाल विकण्यासाठी येत असल्याने धर्माबाद येथे मुख्य बाजारपेठेचे स्वरूप आलेले आहे.
(२) मुख्य बाजारपेठ अथवा औद्योगिक वसाहत बाबतचा कोणताही प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

नवी मुंबईतील वाशी-तुर्भे येथील मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती (एपीएमसी) उरण परिसरातील न्हावा- शेवा टाऊन सिटीमध्ये स्थलांतरीत करण्याचा घेतलेला निर्णय

(१२) ३४०३४ (१२-०१-२०२२). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील वाशी-तुर्भे येथील मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती (एपीएमसी) उरण परिसरातील न्हावा- शेवा सिटीमध्ये स्थलांतरीत करण्याचा शासनाच्या विचाराधीन असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी केव्हा निर्णय घेण्यात येणार आहे ?

श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२९-०४-२०२२) : (१) हे खरे नाही.

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती (एमपीएमसी) मार्केट जागे अभावी नवी मुंबईत स्थलांतरीत झाल्यानंतर पुन्हा बाजार समिती नवी मुंबईतील उरण परिसरातील न्हावा-शेवा टाईन सिटीमध्ये स्थलांतरीत करण्याबाबत सप्टेंबर, २०२१ अखेर काही वृत्तपत्रात अशा आशयाची बातमी छापून आलेली आहे. त्यामध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती यांनी बाजार विस्तारासाठी जागेची गरज असल्याचे प्रतिपादन केले असले तरीही मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती कडून विस्ताराबाबतचा कोणताही प्रस्ताव विचाराधीन नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

पालघर जिल्ह्यातील नवघर (पूर्व) वसई ते ससुनवघर खाडीचे रुंदीकरण व खोलीकरण करण्याबाबत

(१३) ३४१४१ (१२-०१-२०२२). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील जिल्ह्यांमध्ये जुलै, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे महापूर येऊन मोठ्या प्रमाणावर जीवितहानी व वित्तहानी झाल्याच्या पार्श्वभूमीवर पालघर जिल्ह्यातील नवघर (पूर्व) वसई ते ससुनवघर खाडीचे रुंदीकरण व खोलीकरण करण्यासंदर्भातील निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्र्यांना दि. ९ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास दिलेले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने रुंदीकरण व खोलीकरण करण्यासदंर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विजय वडेट्टीवार (२७-०४-२०२२) : (१) सदर निवेदन विभागास प्राप्त झाल्याचे आढळुन येत नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

वसमत (जि.हिंगोली) तालुक्यातील मॉर्डन मार्केट बाजार समितीला तत्वता मान्यता मिळणेबाबत

(१४) ३४४८६ (१२-०१-२०२२). श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तालुक्यातील वसमत (जि.हिंगोली)येथील मॉर्डन मार्केट बाजार समितीला तत्वता मान्यता मिळाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी मौजे कन्हेरगाव येथील गट क्र.७० मधील २६,४२ हेक्टर जमिनीचा ताबा शासनाच्या ३० मे, २००९ च्या आदेशानुसार महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ,पुणे यांना प्राप्त झाला, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, मॉडर्न मार्केट प्रकल्पाचे काम सुरु होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२९-०४-२०२२) : (१) कन्हेरगाव वसमत(जि.हिंगोली) येथे मॉडर्न मार्केट उभारणेबाबत शासनाने दिनांक ३.१२.२००८ रोजीच्या शासन निर्णायन्वये मान्यता दिली आहे.
(२) होय.
(३) बसमतनगर जिल्हा हिंगोली येथे टर्मिनल मार्केटच्या मॉडर्न मार्केट शासनाच्या वित्तिय सहभागाने उभारणेकरिता महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाची नोडल एजन्सी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. तसेच शासन निर्णय दिनांक २०.१२.२०२१ अन्वये पणन सुविधा निर्माण करण्यासाठी रक्कम रु.६.४४ कोटी इतक्या खर्चास मान्यता दिली असून दिनांक २८.३.२०२२ रोजीच्या पत्रान्वये रु.६.४४ कोटी एवढया रकमेच्या खर्चासाठी निविदा प्रकिया राबविण्यास शासन मान्यता दिली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

एलफिस्टन (मुंबई) परिसरात वाहतूक विभागातील पोलीस शिपाई यांनी एका महिलेशी केलेली गैरवर्तणूक

(१५) ३४५३१ (०७-०१-२०२२). श्री.अजय चौधरी (शिवडी) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एलफिस्टन (मुंबई) परिसरात दिनांक १७ सप्टेंबर, २०२० रोजी वाहतूक विभागातील पोलीस शिपाई हे कार्यरत असताना त्यांनी एका महिलेस स्कुटीवरुन जात असतांना अमानुष वागणूक देऊन तिच्याशी गैरवर्तणूक करुन तिची स्कुटी हाताने ओढल्याने महिलेस जबर दुखापत

झाल्याची तक्रार महिलेने दिनांक १७ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास भोईवाडा पोलीस स्थानकात नोंदवून वाहतूक पोलिसांविरुध्द कारवाई करावी अशी मागणी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त महिलेला दुखापत झाल्यामुळे तिच्यावर के.ई.एम. रुग्णालयातील अपातकालीन रुग्णालयात उपचार करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू पोलीस शिपाई यांनी दिनांक १३ सप्टेंबर, २०२० रोजी अशाच पद्धतीने दुसऱ्या एका महिलेसोबत उर्मटपणे वागूणक देऊन असभ्य वागणूक दिल्याबाबतची तक्रार उक्त महिलेने पोलीस स्थानकात दाखल केली, तसेच या दोन्ही प्रकाराबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २३ नोव्हेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे पोलीस शिपायाविरुद्ध चौकशी करुन कारवाई करावी अशी मागणी केली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी वाहतूक पोलीस शिपाई यांच्यावर कारवाई करण्याबाबत आतापर्यंत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (१३-०६-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.

श्रीमती सोनाली जालान यांनी दि. १३.०९.२०२० रोजी ई मेलद्वारे तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २३.११.२०२० रोजी वा त्या दरम्यान केलेल्या तक्रार अर्जावरुन पोलीस शिपायाविरुध्द चौकशी प्रस्तावित केली होती.
(४) या प्रकरणी पोलीस शिपाई यांची चौकशी करण्यात आली. सदर पोलीस शिपाई यांची बदली करण्यात आली व त्यांच्याकडून भविष्यात असे वर्तन होऊ नये याबाबत "समज" देण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

फुले अडतमुक्त करण्याची शेतकऱ्यांकडून होत असलेली मागणी

(१६) ३५४५७ (१२-०१-२०२२). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने शेतकऱ्यांसाठी कांदा, बटाटा व तरकारी आदी शेतीमाल अडत मुक्त केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, फुलांवर १२ ते १५ टक्के अडत अजूनही कायम असल्याने सदर अडत राज्यशासनाने रद्द करण्याची मागणी फूल उत्पादक शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन शासनाने फुले अडतमुक्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२९-०४-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२) महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील कलम ३१(२) नुसार बाजार समिती क्षेत्रात खरेदी-विक्री करण्यात येणाऱ्या कृषि उत्पन्नाच्या किंवा कृषि उत्पनाच्या वर्गाच्या संबंधात अकारावयाची अडत ही खरेदीदाराकडून आकारणी करण्याची तरतूद आहे. शेतकऱ्याकडून अडत वसूल करण्याची तरतूद नाही. तसेच फूल उत्पादक शेतकऱ्यांकडून अडत घेतली जात असल्याबाबत अथवा रद्द करण्याबाबत शेतकऱ्याकडून निवेदन/तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती (एमपीएमसी) मार्केट स्थलांतर व तद्नंतर तेथील जागेवर कृती आराखडा तयार करणेबाबत.

(१७) ३५६५४ (१२-०१-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आशिया खंडातील सर्वात मोठी समजली जाणारी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती (एमपीएमसी) मार्केट जागे अभावी नवी मुंबईत स्थलांतरीत झाल्यानंतर आता ४० वर्षानंतर पुन्हा ही बाजार समिती नवी मुंबईतील उरण परिसरातील न्हावा-शेवा टाईन सिटीमध्ये स्थलांतरीत करण्याचा शासनाने दि.५.सप्टेंबर, २०२१ रोजीच्या सुमारास निर्णय घेतला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाजार समिती मार्केट उरण येथे स्थलांतरीत झाल्यानंतर येथील ७० हेक्टर जागेच्या विनियोजनाबाबत शासन तथा सिडको तर्फे कृती आराखडा तयार करुन कोणती योजना आखली जात आहे वा येत आहे,

(३) असल्यास, उक्त बाजार समिती उरण परिसरात स्थलांतरीत करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, याबाबत शासनाचे धोरण काय आहे? व बाजार समिती स्थलांतरीत करुन कार्यान्वीत करण्याबाबत शासनातर्फे कोणती उपाययोजना व कार्यवाही करण्यात आली आहे,

(४) अद्याप, याबाबत शासनाने कोणतीही कार्यवाही केली नसल्यास त्याची कारणे काय आहेत?

श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२९-०४-२०२२) : (१) हे खरे नाही.

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती (एमपीएमसी) मार्केट जागे अभावी नवी मुंबईत स्थलांतरीत झाल्यानंतर पुन्हा बाजार समिती नवी मुंबईतील उरण परिसरातील न्हावा-शेवा टाईन सिटीमध्ये स्थलांतरीत करण्याबाबत सप्टेंबर, २०२१ अखेर काही वृत्तपत्रात अशा आशयाची बातमी छापून आलेली आहे. त्यामध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती यांनी बाजार विस्तारासाठी जागेची गरज असल्याचे प्रतिपादन केले असले तरीही मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती कडून विस्ताराबाबतचा कोणताही प्रस्ताव विचाराधीन नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

धुळे शहरातील भाऊसाहेब हिरे शासकीय मेडिकल कॉलेज येथे रक्तपेढी विभागात होत असलेल्या गैरकारभाराबाबत

(१८) ३५७२१ (०६-०१-२०२२). श्री.फारूक शाह (धुळे शहर) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे शहरातील डॉ भाऊसाहेब हिरे शासकीय मेडिकल कॉलेजमध्ये रक्तपेढी विभागाचे प्रमुख श्री.दीपक शेजवळ यांनी त्यांचे पदाचा दुरुपयोग करुन कोरोना काळात खाजगी रक्तपेढ्यांना रक्तपुरवठा करुन नियमबाहय संपत्ती जमविल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भाऊसाहेब हिरे शासकीय मेडिकल कॉलेजचे डीन यांनी डॉ.शेजवळ यांची नियमबाह्य नेमणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार या प्रकरणाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अमित विलासराव देशमुख (०९-०६-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

हिंगणा व दवलामेटी (जि.नागपूर) येथे तालुका क्रीडा संकुलाच्या बांधकामाच्या प्रस्तावाबाबत

(१९) ३६१६२ (१०-०१-२०२२). श्री.समिर मेघे (हिंगणा) : सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणा व दवलामेटी (जि.नागपूर) येथे तालुका क्रीडा संकुलाच्या बांधकामाकरिता ११.१७ कोटीचा प्रस्ताव सादर करुनही मंजुरी देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर क्रीडा संकुलाच्या बांधकामास तातडीने मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुनिल केदार (१३-०६-२०२२) : (१) व (२) हे खरे नाही, तालुका क्रीडा संकुल, हिंगणासाठी रु.१११७.०२ लक्ष आणि तालुका क्रीडा संकुल नागपूर ग्रामीण(दवलामेटी) साठी रु.९२९.०४ लक्षच्या अंदाजपत्रकास राज्य क्रीडा विकास समितीच्या दि.०४.०२.२०२० च्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. सदर दोन्ही तालुका क्रीडा संकुलांना तत्कालीन अनुदान मर्यादेत प्रत्येकी रु.१००.०० लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

खामगाव (जि.बुलढाणा) येथील पंचायत समितीने मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पाणंद रस्ते आराखड्यास मंजुरी देण्याबाबत

(२०) ३७९९१ (१२-०४-२०२२). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगाव (जि.बुलढाणा) येथील महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत मातोश्री ग्रामसमृद्धी शेत-पाणंद रस्ते योजना मंजूर करण्यासाठी गटविकास अधिकारी पंचायत समिती खामगाव यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हापरिषद, बुलढाणा यांच्याकडे ६३ ग्रामपंचायतींचे प्रस्ताव दिनांक ४ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास सादर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हापरिषद, बुलढाणा यांनी पुढील मंजुरीसाठी संबंधित विभागाकडे सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संदीपानराव भुमरे (०३-०६-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही, तथापि, ६१ ग्राम पंचायत मधील ३९७ रस्त्यांचा आराखडा शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे.

(३) सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाकरीता दि.२५/०१/२०२२ रोजच्या शासननिर्णयात शेत/पाणंद रस्त्यांच्या आराखडयास मान्यता देण्यात आली आहे. तसेच सन २०२२-२३ करीता शासननिर्णय दि.०३/०३/२०२२ व दि.०९/०३/२०२२ अन्वये शेत/पाणंद रस्त्यांच्या आराखडयास मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌द्‌भवत नाही.

भाषा सल्लागार समितीची पुनर्रचना करण्याबाबत.

(२१) ३८०८३ (०९-०४-२०२२). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) : सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मायबोली मराठी भाषेचे अगामी २५ वर्षाचे महाराष्ट्र राज्याचे धोरण ठरविणे आणि मराठी भाषा अभिवृध्दीसाठी नवनवे उपाय आणि अभिनव कार्यक्रम सरकारला सुचविण्यासाठी भाषा सल्लागार समितीची पुनर्रचना करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या समितीचे अध्यक्ष कोण आहेत व किती सदस्यांचा समितीत समावेश आहे, तसेच या समितीचा कार्यकाल किती वर्षाचा ठरविण्यात आला आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, याबाबतची अंमलबजावणी करुन भाषा सल्लागार समिती स्थापन करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केला वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. सुभाष देसाई (२०-०५-२०२२) : (१) होय, हे खरे आहे
(२) भाषा सल्लागार समितीची पुनर्रचना शासन निर्णय क्र.भासस-२०२०/प्र.क्र.६/भाषा-१,दि.३०.१२.२०२१ अन्वये करण्यात आलेली असून समितीचे अध्यक्ष श्री.लक्ष्मीकांत देशमुख व एकूण ३७ सदस्यांची नियुक्ती ही ३ वर्षासाठी किंवा शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत करण्यात आलेली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

अहमदपूर (जि.लातूर) तालुक्यात थंडीचे प्रमाण वाढत असून धुके पडल्यामुळे रब्बी हंगामाची पिकांचे नुकसान झाल्याबाबत

(२२) ३८२६९ (२८-०३-२०२२). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदपूर (जि.लातुर) तालुक्यात दिनांक २५ डिसेंबर, २०२१ रोजी पासून थंडीचे प्रमाण वाढत असल्याने धुके पडल्यामुळे रब्बी हंगामाची हरभरा, गहू, कांदा, लसूण, द्राक्ष, आंबे, भाजीपाला आदि पिकांचे नुकसान झाले आहे, हेखरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त नुकसानीचे पंचनामे करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विजय वडेट्टीवार (२७-०४-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) विहित निकष पूर्ण करीत असलेल्या प्रकरणी शेतीपिकांच्या नुकसानीकरिता मदत देण्यात येते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

विश्वकोष मंडळाच्या लेखकांना गेल्या वर्षभरापासून मानधन मिळाले नसल्याबाबत..

(२३) ३८२९० (०९-०४-२०२२). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.दिपक चव्हाण (फलटण) : सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विश्वकोष मंडळासाठी नोंदी लिहिणाऱ्या लेखकांना मिळणाऱ्या मानधनात नियमितता नसल्याचे तर अनेक लेखकांना मागील वर्षापासून मानधनच मिळाले नसल्याचे दिनांक ३० डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यासंदर्भातील नोंदही कमीतकमी सातशे व जास्तीत जास्त दोन ते अडीच हजार शब्दापर्यंत असून एका नोंदीसाठी लेखकाला २ रुपये दिले जात असतांना लेखकांच्या नोदींच प्रसिध्द होत नसल्याच्या तक्रारी त्याचसुमारास संबंधित लेखकांनी केल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यापुर्वीच्या कार्यपध्दतीनुसार, लेखन व लेखकांच्या नोंदी समन्वयकांनी तपासून विद्याव्यासंगीकडे पाठविल्या जाऊन त्यांनी शिक्कामोर्तब केल्यानंतरच नोंदी प्रसिध्दीसाठी पाठविल्या जात असतांना विश्वकोष मंडळाचे सध्याचे नवीन धोरणानुसार त्यामध्ये खंड पडला असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, लेखकांचे प्रलंबित असलेले मानधन तसेच मंडळाकडे प्राप्त झालेल्या नोंदी प्रसिध्द करण्याबाबत तसेच मंडळाचे नवीन धोरण अडवणुकीचे ठरत असल्यास त्यामध्ये सुधारणा करण्याबाबत,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. सुभाष देसाई (२०-०५-२०२२) : (१) अंशत: खरे आहे.

वित विभागाच्या, क्र. संकीर्ण २०२०/ प्र.क्र. ६/२०/कोषा-प्रशा-५, दि. १२.११.२०२१ च्या शासन निर्णयानुसार कार्यालयात सादर होणाऱ्या देयकांची प्रदाने त्रयस्थ अदाता (मागणीदार, पुरवठादार, कंत्राटदार, अनुदान प्राप्त संस्था, कर्मचारी किंवा शासनाच्या विविध योजनांचे लाभार्थी) यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्याबाबत आदेशित केले आहे. त्यानुसार संबंधित लेखक-समीक्षकांचे बँक तपशील प्राप्त करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे. संबंधित लेखक-समीक्षकांचे बँक तपशील प्राप्त झाल्यावर अधिदान व लेखा कार्यालयात त्यांची अदाता नोंदणी करण्याची कार्यवाही करण्यात येईल व त्यानंतरच नोंदींच्या तपशीलानुसार संबंधितांच्या बँक खात्यात रक्कम थेट जमा करण्याची कार्यवाही महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाकडून करण्यात येईल.

(२) विश्वकोश हा प्रादेशिक भाषेत आहे; पण त्याचा दर्जा आंतरराष्ट्रीय असला पाहिजे. संकेतस्थळावर प्रकाशित करावयाच्या नोंदी मध्ये एकवाक्यता असणे, तसेच नोंदींची संख्या वाढवताना गुणात्मकतेचाही विचार करणे आवश्यक आहे. त्यामुळे ज्ञानमंडळांकडून आलेल्या नोंदी या दृष्टीने पुन्हा तपासण्यात येत असल्याने नोंदी प्रकाशित करण्याची प्रक्रिया मंदावल्यासारखी वाटते.

(३) केवळ नोंदींच्या संख्येला महत्व न देता, नोंदीची अचुकता, गुणवत्ता व विश्वासार्हता या गोष्टींना महत्व देऊन ज्ञानमंडळांच्या नोंदींचे कार्यालयीन पातळीवर संपादन करण्यात येत आहे. त्यामुळे स्वाभाविकपणे नोंदी प्रसारित करण्याची प्रक्रिया थोडी मंदावली आहे.

(४) सदरचे प्रलंबित मानधनाचे देयक अधिदान व लेखाधिकारी कार्यालयामध्ये सादर करण्याची कार्यवाही सुरू आहे. नोंदी संपादित होऊन संकेतस्थळावर प्रसारित झाल्या की संबंधितांचे मानधन प्रथेप्रमाणे देण्यात येईल. ते लवकरात लवकर देण्याची कार्यवाही महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाकडून करण्यात येईल.

(५) कोविड-१९ या साथीच्या रोगाच्या प्रादूर्भावामुळे कार्यालयीन मर्यादित उपस्थिती, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, अनुदान यावर निर्बंध असल्याने काही अंशी विलंब झाला तरीही शक्य तेवढी देयके अदा करण्यात आलेली आहेत. लेखक, समीक्षकांकडून प्राप्त झालेल्या नोंदी तपासण्याची कार्यवाही चालू आहे. तपासणीअंती नोंदी प्रकाशित झाल्यानंतर उर्वरीत प्रलंबित देयके संबंधितांना अदा करण्यात येतील.

रेडगी आश्रमशाळेत (ता. चामोर्शी, जि. गडचिरोली) येथील माध्यमिक शाळेतील वसतीगृह अधिक्षकाने केलेला गैरव्यवहार

(२४) ३८३६६ (३१-०३-२०२२). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेगडी आश्रमशाळेतील (ता. चामोर्शी, जि. गडचिरोली) येथील विद्यार्थ्यांसाठी शासकीय माध्यमिक आश्रमशाळेच्या वसतीगृह अधिक्षकाने सन २०१६-१७ व २०१७-२०१८ या कालावधीत ४ लाख १९ हजार रुपयाचे अन्नधान्य किराणा, भाजीपाला, अंडी-फळे आदि साहित्य खरेदी करुन निधीचा अपहार केल्याचे दि. ३ जुन, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसतीगृह अधिक्षकाने खरेदी केलेल्या अन्नधान्यात व इतर साहित्याच्या नोंदीच्या खोट्या पोचपावत्या सादर केल्या असल्याची तक्रार कनिष्ठ विस्तार अधिकारी यांनी केल्यावर त्याबाबत कार्यालयाने तपासणी समिती नेमली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, समितीच्या अनुंषगाने पोलिसात तक्रार दाखल करुन संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने संबधित दोषीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

ॲड. के.सी.पाडवी (१८-०५-२०२२) : (१) (२) व (३) हे खरे आहे.

(४) व (५) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली यांचे अधिनस्त असलेली शासकीय आश्रमशाळा रेगडी येथील वसतीगृह अधिक्षक यांनी सन २०१६-१७ व २०१७-१८ या वर्षात ४ लक्ष १९ हजार रुपयाच्या खोट्या पोहच पावत्या देवुन शासकीय निधीचा अपहार करुन शासनाची फसवणूक केली आहे. त्यानुसार संबंधीत अधिक्षक यांचेवर FIR No १६२, दिनांक ०२.०७.२०१८ अन्वये फौजदारी गुन्हा दाखल केलेला आहे. व पुढील नियमानुसार कार्यवाही करणेसाठी मुळ दस्तऐवज पोलीस मदत केंद्र रेगडी यांच्याकडे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोली यांनी सुपुर्द केले आहे.

भोर (ता.हवेली, जि.पुणे) विभाग-राजगड पोलीस स्टेशनच्या हद्दीतील गावांचा समावेश हवेली ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीत करण्याबाबत

(२५) ३८४८५ (१२-०४-२०२२). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर (ता.हवेली, जि.पुणे) विभाग-राजगड पोलीस स्टेशनच्या हद्दीत समाविष्ट असलेली गावे कमी करुन त्या गावांचा समावेश हवेली ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीत करण्याचा निर्णय प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तालुक्यातील खडकवासला विधानसभा मतदारसंघात येणारी मोरदरी, कल्याण, कोंढणपूर, रहाटवडे, आर्वी, शिवापूर, खेड शिवापूर, श्रीरामनगर, गाउडदरा ही गावे सध्या भोर विभाग अंतर्गत राजगड पोलीस स्टेशनच्या अंतर्गत येत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू गावे ही हवेली ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीमधील गावांना लागून असल्याने त्या गावातील नागरिकांना कोणत्याही छोट्या-मोठ्या तक्रारीसाठी वा इतर प्रशासकीय कामासाठी हवेली ग्रामीण पोलीस स्टेशन नजीकच्या २६ किमी अंतरावर असणाऱ्या राजगड पोलीस स्टेशनला जावे लागत असल्याने सर्वसामान्य नागरिकाला अतिशय जिकरीचे होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीअंती त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (१३-०६-२०२२) : (१) नाही.

(२) होय.

(३) नाही.

(४) होय.

याबाबत पोलीस अधीक्षक, पुणे ग्रा. यांनी दि.२१/५/२०२२ च्या पत्राव्दारे पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना कळविल्यानुसार संबंधित सर्व ग्रामपंचायतींनी त्यांचे गावांना राजगड पोलीस ठाणे हे सर्व दृष्टीने सोयीचे असल्याने, संबंधित गांवे ही हवेली पोलीस ठाणेमध्ये सामाविष्ट न करता, ती राजगड पोलीस ठाणेमध्येच ठेवावीत, अशी लेखी निवेदन सादर केली आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

गेवराई (जि.बीड) येथे माहे ऑगस्ट-सप्टेंबर २०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्यांना नुकसानभरपाई देण्याबाबत

(२६) ३८७६८ (३१-०३-२०२२). श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई (जि.बीड) येथे माहे ऑगस्ट-सप्टेंबर २०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक शेतक-यांचे पशुधन वाहून गेले, अनेकांची घरे पुर्णत: नष्ट झाली तर काही घरांची पडझड होऊन मोठे नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नुकसानीची शासनाकडून मिळणारी मदत नुकसानग्रस्तांना आजतागायत मिळाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करुन संबधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, ४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विजय वडेट्टीवार (२७-०४-२०२२) : (१) खरे आहे,
(२) माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०२१ मध्ये अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतीपिकां व्यतिरिक्त मालमत्ता व इतर नुकसानीकरिता शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दि.३१.०३.२०२२ अन्वये संबंधित विभागीय आयुक्तांना एकूण रू.८५७६.९५ लक्ष इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. सदर निधीपैकी बीड जिल्हयाकरिता रू.४१९९.२७ लक्ष इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व प्रदूषण नियंत्रण मंडळाने अनेक नियम व अटीशर्ती डावलून विशेष परवानगी दिल्याबाबत

(२७) ३९१७१ (०९-०४-२०२२). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील तारापूर औद्योगिक वसाहतीमधील प्लॉट नं.०/१३, ई-१३३ या जागेवर सडेकर एन्व्हायरो इंजिनिअर्स प्रा.लि. या खासगी कंपनीला परवानगी देतांना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व प्रदूषण नियंत्रण मंडळाने अनेक नियम व अटीशर्ती डावलून विशेष परवानगी दिल्याचे माहे जानेवारी, २०२१ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी नियम व अटीशर्ती डावलून नियमाबाह्य परवानगी देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले,
(३). असल्यास, उक्त प्रकरणी दोषी आढळून आलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहेत,
(४). नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. सुभाष देसाई (१९-०५-२०२२) : (१) हे खरे नाही,

तारापूर औद्योगिक क्षेत्रात प्लॉट नं.०/१३, ई-१३३ अशा क्रमांकाचा भूखंड नसून ओपन स्पेस क्र.२३(१)पार्ट मधून आरेखीत केलेला ई-१३३ क्रमांकाचा भूखंड आहे.

म.औ.वि.महामंडळाच्या धोरणानुसार प्रादेशिक कार्यालय,ठाणे यांच्या दि.०९.१२.२०२१ च्या पत्रान्वये भूखंड क्र.ई-१३३ चे हस्तांतरण मे.डी.आर.कोट्स इंक आणि रेझिन्स प्रा.ली.यांचे कडून मे. सडेकर एन्व्हायरो इंजिनिअर्स प्रा.लि यांना करण्यात आलेले आहे.

भूखंड क्र.ई-१३३ (ओएस-२३/पार्ट-१) करीता मे. सडेकर एन्व्हायरो इंजिनिअर्स प्रा.लि यांनी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून दि.११.०१.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कंसेट टू ऑपरेट प्राप्त केलेले आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही

सोलापूर जिल्हयातील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या यादीतुन पाच तालुके वगळल्याबाबत

(२८) ३९३३१ (३१-०३-२०२२). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील बार्शी, अक्कलकोट, उत्तर सोलापूर,दक्षिण सोलापूर,माढा व मोहोळ, सांगोला,मंगळवेढा,पंढरपूर,करमाळा,व माळशिरस या तालुक्यांचे माहे सप्टेंबर व ऑक्टोंबर, २०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त नुकसानीचे पंचनामे करुन बाधित ७९ हजार ४४० शेतकऱ्यांना शासन निकषानुसार ८० कोटी रुपये मदत देण्याबाबत प्रस्ताव सादर केलेला असून जिरायत शेतकऱ्यांसाठी हेक्टरी १० हजार रुपये, बागायतीसाठी हेक्टरी १५ हजार आणि फळपिकांसाठी नुकसानीसाठी हेक्टरी २५ हजारांची मदत देण्याचा निर्णय झाला असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये निदर्शनास आले, आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने पहिल्या टप्प्यात ७५ टक्के म्हणजेच ६० कोटी रुपये वितरित केले असून प्रशासनाच्या दिरंगाईमुळे सदर रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होण्यास विलंब झालेला असल्याने उर्वरीत २० कोटी अद्यापपर्यंत नुकसानग्रस्ताना मिळालेले नाही हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करुन उर्वरीत २० कोटी नुकसानग्रस्तांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विजय वडेट्टीवार (२७-०४-२०२२) : (१) खरे आहे,
(२) खरे आहे,
(३) ऑगस्ट-सप्टेंबर, २०२१ मध्ये अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीकरिता राज्य आपत्ती प्रतिसाद निधी व राज्य वाढीव निधीमधून पहिल्या हप्त्यापोटी शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दि.२७.१०.२०२१ अन्वये रू.६०२२.०६ लक्ष एवढा निधी सोलापूर जिल्हयाकरिता उपलब्ध करून देण्यात आला आहे. तद्नंतर शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दि.१६.०२.२०२१ अन्वये रू.२००७.३६ लक्ष उर्वरित निधी सोलापूर जिल्हयास उपलब्ध करून देण्यात आला आहे. असा एकूण रू.८०२९.३२ लक्ष इतका निधी सोलापूर जिल्हयाकरिता उपलब्ध करून देण्यात आला असून संपूर्ण निधी बाधित शेतकऱ्यांना वितरीत करण्यात आला आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

जनजाती सल्लागार परिषदेची बैठक घेण्याबाबत

(२९) ३९४८३ (०९-०४-२०२२). डॉ.संदीप धुर्वे (अर्णी) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतीय संविधानाच्या ५ व्या अनुसूचितील भाग - ख मधील परिच्छेद ४(१) नुसार राज्यामध्ये आदिवासी समाजाच्या कल्याणासाठी योजना, धोरण, कार्यक्रमाचे नियमन आणि आदिवासींच्या विकासाच्या संदर्भातील विचारलेल्या विषयांच्या बाबतीत महामहिम राज्यपाल यांना सल्ला देणे करीता जनजाती सल्लागार परिषद अस्तित्वात आहे, हे खरे आहेत काय,

(२) असल्यास, या परिषदेचे पुनर्गठन दिनांक २३ जुलै २०२० रोजी वा त्यासुमारास करण्यात आले, हे खरे आहेत काय,

(३) असल्यास, जनजाती सल्लागार परिषदेच्या बैठका किती घेण्यात आल्यात आहेत आल्या नसतील तर त्याची कारणे काय आहेत,

ॲड. के.सी.पाडवी (२२-०४-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) राज्यात उद्‌भवलेल्या कोरोना विषाणुच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर बैठका घेण्यास बंदी असल्याने जनजाती सल्लागार परिषदेची (TAC) बैठक झालेली नाही.

तथापि, जनजाती सल्लागार परिषदेची (TAC) बैठक आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे.

चाळीसगाव (जि.जळगाव) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयाचे रुपांतर उपजिल्हा रुग्णालयात करण्याबाबत

(३०) ३९६९५ (१३-०४-२०२२). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाळीसगाव (जि.जळगाव) तालुक्यात ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय कार्यरत असुन, सदर ग्रामीण रुग्णालय सध्या भाडेतत्वावरील इमारतीत कार्यरत असून तेथे सुमारे १२ कोटी रुपये खर्च करून नवीन जागेत सर्व मुलभूत सोयीसुविधायुक्त ग्रामीण रुग्णालयाची इमारत उभारण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा तालुका जिल्हयातील भौगोलिक दृष्ट्या बराच मोठा व अत्यंत महत्वाचा असून जळगाव जिल्हा रुग्णालयापासून सुमारे १०० किमी अंतरावर असून तालुक्यातून राष्ट्रीय महामार्ग व रेल्वेमार्ग जात असल्याने व तालुक्याची लोकसंख्या जवळपास ६.०० लक्ष असल्याने तालुकास्तरावर येणाऱ्या बाहयरुग्ण संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णालयात प्रसूतीसाठी येणाऱ्या महिलांची संख्या, सर्पदंश, जळीत तसेच अपघातांचे वाढते प्रमाण पाहता सेवा-सुविधांच्या बाबतीत ग्रामीण रुग्णालय अपुरे पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रुग्णांची होणारी गैरसाय टाळण्यासाठी व वेळेत आरोग्य सुविधा उपलब्ध होण्यासाठी ग्रामीण रुग्णालयाचे ३० खाटावरून १०० खाटांचे श्रेणीवर्धन करून उपजिल्हा रुग्णालय करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आह,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (१२-०५-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) बाहयरुग्ण संख्येत चढ उतार दिसुन येतो. ओपीडी संख्या एप्रिल २१ ते जानेवारी २०२२ पुढील प्रमाणे आहे.

एप्रिल २१ - ७४,	मे २१ - १४६,	जून २१ - १९८,
जुलै २१ - ८५७,	ऑगस्ट २१ - ८५६,	सप्टेंबर२१ - ९८१,
ऑक्टोबर २१ -६४९,	नोव्हेंबर २१ -२६९,	डिसेंबर २१ -१९०,
जानेवारी २२ -१७३७		

(३) हे खरे नाही.
चाळीसगाव ग्रामीण रुग्णालयात दरमहा सरासरी ८१ प्रसुती, ६ सर्पदंशावरील व २५ अपघातावरील उपचार होत असून, बेड ऑक्युपन्सी रेट १२.८७ इतका आहे.
(४) सदर प्रस्ताव अद्याप शासनास प्राप्त नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

सांगली जिल्हयात माहे ऑक्टोबर, २०२१ महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे द्राक्षबागांचे नुकसान झाल्याबाबत

(३१) ३९८१८ (३०-०३-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्हयात माहे ऑक्टोबर, २०२१ महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे द्राक्षबागांचे नुकसान झाले असून या नुकसानीचे पंचनामे पूर्ण करण्यात येऊनही अद्यापर्यंत नुकसानग्रस्तांना नुकसानभरपाई मिळाली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्याअनुषंगाने नुकसानग्रस्तांना नुकसानभरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विजय वडेट्टीवार (२७-०४-२०२२) : (१) खरे नाही, माहे ऑक्टोबर, २०२१ महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे द्राक्षबागांचे नुकसान झाल्याचे निर्दशनास आलेले नाही. त्यामुळे नुकसानीचे पंचनामे करण्यात आले नाही.
(२) विहित निकष पूरण करीत असल्यास शेतीपिकांच्या नुकसानीकरिता मदत देण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

सांगली जिल्हयातील आरोग्य विभागत विविध रिक्त पदे भरण्याबाबत.

(३२) ३९८१९ (१३-०४-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील आरोग्य विभागत सुमारे ५० टक्के विविध पदे रिक्त असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राजेश टोपे (०७-०६-२०२२) : (१) हे अंशत: खरे आहे.
सांगली जिल्हयातील पदांचा तपशील खालीप्रमाणे आहे.

गट क			
पदे	मंजूर	भरलेली	रिक्त
राज्यस्तर	२१३	१७३	३५
जि.प. स्तर	१२३३	६५०	५८३
एकूण	१४६६	८२३	६१८

गट ड

राज्यस्तर	१५५	९६	५९
एकूण	१५५	९६	५९

(२) प्राप्त अहवालानुसार सांगली जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालये, शहरी आरोग्य केंद्र, जिल्हा सामान्य रुग्णालयात कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्ती, स्वेच्छासेवानिवृत्ती, मयत, पदोन्नती तसेच नविन निर्माण झालेल्या आरोग्य संस्थेकरिता नवीन मनुष्यबळ निर्मिती झाल्याने रिक्त पदांची संख्या अधिक असल्याचे दिसून येत आहे.

(३) सार्वजनिक आरोग्य विभागातील येथील गट क व ड पदे भरणेबाबत माहे ऑगस्ट २०२१ मध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली असून सदर पदाची परिक्षा दि. २४.१०.२०२१ व दि.३१.१०.२०२१ रोजी घेण्यात आली होती. गट क व ड संवर्गाच्या पेपर फुटीच्या तक्रारींच्या अनुषंगाने विभागाकडून गुन्हा दाखल करण्यात आलेला असून पुढील पोलीस तपास चालू आहे. तसेच, जिल्हा परिषदअंतर्गत आरोग्य सेवेची पदे ग्राम विकास विभागामार्फत भरण्याची कार्यवाही दि.१०.०५.२०२२ रोजीच्या शासन निर्णयानूसार सुरू झाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

जत (जि. सांगली) तालुक्यातील कायम दुष्काळग्रस्त ४० गावांचा विकास आराखडा तयार करण्याबाबत

(३३) ३९८७५ (११-०४-२०२२). श्री.विक्रमसिंह सावंत (जत) : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जत (जि. सांगली) सीमा भागातील विकासापासून वंचित ४० गावांतील दुष्काळग्रस्त लोकांनी एकत्र येत यापूर्वी पाणी द्या अन्यथा कर्नाटकात जाण्याची परवानगी द्या या मागणीसाठी उमदी येथे धरणे आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाचा संदर्भ देत कर्नाटक मुख्यमंत्र्यांनी ही गांवे आम्ही कर्नाटकात घेवू असे विधान केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने निर्णय घेवून या वंचित गावांचा तातडीने विकास आराखडा तयार करुन या गावांसाठी विशेष निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयंत पाटील (१४-०६-२०२२) : (१) होय,

(२) जलसंपदा विभागास ज्ञात नाही.

(३) जलसंपदा विभागामार्फत जत (जि. सांगली) तालुक्यातील वंचित गावांना सिंचन सुविधा उपलब्ध करून देणेकरीता विस्तारीत म्हैसाळ उपसा सिंचन योजना प्रस्तावित आहे.

सदर योजनेचे प्राथमिक सर्वेक्षणाचे काम पूर्ण झालेले असून संकल्पनाचे व प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम क्षेत्रीय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबईतील घाटकोपर येथील एका मुलीचा लसीकरणामुळे झालेला मृत्यू

(३४) ४०२३१ (११-०४-२०२२). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील घाटकोपर येथील एका १५ वर्षीय मुलीचा लसीकरणामुळे मृत्यू झाला असल्याची घटना दि.१४ जानेवारी,२०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार याबाबत दोषी असण्या-या संबधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे (१३-०६-२०२२) : (१) हे खरे नाही.

मुंबईतील घाटकोपर येथील १५ वर्षीय मुलीचा मृत्यू कोविड लसीकरणामुळे झालेला नाही.

(२) व (३)

सदर मृत्यूबाबत राज्य एईएफआय (Adverse event following immunization) उपसमिती, मुंबई विभाग, यांच्या मार्फत चौकशी करण्यात आली असून चौकशीमध्ये सदर मुलीचा मृत्यू कोविड लसीकरणामुळे झाला नसल्याबाबत निष्कर्ष आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

देहगांव ते वानोळा (ता.माहूर, जि.नांदेड) येथील जंगलातील ३ कि.मी.च्या पांदण रस्त्याच्या कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(३५) ४०२७७ (२८-०३-२०२२). श्री.माधवराव पवार (हदगाव) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहुर (जि.नांदेड) येथे देहगांव ते वानोळा येथील जंगलातील ३ कि.मी.च्या पांदण रस्त्याचे काम मंजूरीसाठी प्रलंबित आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील आदिवासी वस्ती असलेल्या देहगांवच्या आदिवासी बांधवाना साकुर,कुपटी, पाचौंदा अशा १३ कि.मी.रस्त्याला फेरा मारुन जावे लागत असल्याने जवळ असलेल्या पांदण रस्ताच्या प्रलंबित कामासाठी निधीची आवश्यकता असून आदिवासी विकास योजनाच्या निधीतून विशेष बाब म्हणून निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी होत आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रस्तासाठी आदिवासी विकास योजनेमधुन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. के.सी.पाडवी (२८-०४-२०२२) : (१), (२) व (३) हे खरे नाही.

आदिवासी विकास विभागाकडून आदिवासी उपयोजनेतंर्गत करण्यात येणारी रस्त्यांची कामे ही सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्रामविकास विभाग यांसारख्या विभागांच्या योजनांसाठी पुरक स्वरुपाची योजना असल्याने या विभागामार्फत आदिवासी भागातील रस्त्यांना मर्यादीत स्वरुपात निधी देण्यात येतो.

सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये नांदेड जिल्ह्यातील राज्यस्तर लेखाशिर्ष ५०५४ ५११७ अंतर्गत रु. १५.५० कोटी रकमेच्या १७ रस्ते व पुल बांधकामांना व सन २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी रु. २० कोटी रकमेच्या १२ रस्ते व पुल बांधकामांना तसेच, लेखाशिर्ष ३०५४ २७२२ अंतर्गत सन २०२१-२२ या आर्थिक वर्षामध्ये रु. ४१.१० कोटी रकमेच्या १०५ रस्ता दुरुस्तीच्या कामांना मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

पालघर जिल्हयातील जव्हार, वाडा तसेच ठाणे जिल्हयातील बदलापुर, मुरबाड येथील शासकीय रुग्णालयास बांधकामास अनुदान मिळणेबाबत.

(३६) ४०५४३ (२४-०४-२०२२). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील जव्हार, वाडा तसेच ठाणे जिल्हयातील बदलापुर, मुरबाड येथील शासकीय रुग्णालयास १००/२०० बेडला मान्यता होवूनही रुग्णालयाचे वाढीव बांधकाम व इमारत पूर्ण बांधकाम झालेले नाही, हे खर आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णलयांच्या बांधकामास मंजूरी होऊनही कार्यवाही पूर्ण न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर बांधकामास अनुदान मिळण्याबाबतची सद्यस्तिथि काय आहे?

श्री. राजेश टोपे (०८-०६-२०२२) : (१) हे खरे आहे.

(२) पालघर जिल्हयातील जव्हार रुग्णालयोच २०० खाटांमध्ये श्रेणीवर्धन करण्यास शासन निर्णय दिनांक २.०६.२०१२ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर रुग्णालयाच्या बांधकामाचे रुपये ९०६२.०० लक्ष इतक्या रक्कमेस शासन निर्णय दिनांक २०.०९.२०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली असून सन २०२१-२२ मध्ये रुपये ५००.०० लक्ष इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. तथापि, सार्वजनिक बांधकाम विभागाडून पुढील कार्यवाही सुरु आहे.

ग्रामीण रुग्णालय वाडा चे ३० खाटांवरुन १०० खाटांमध्ये श्रेणीवर्धन करण्यास शासन निर्णय दिनांक २६.०३.२०२१ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर श्रेणीवर्धीत रुग्णालयाच्या बांधकामाचे अंदाजपत्रक प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही जिल्हा स्तरावर सुरु आहे.

ग्रामीण रुग्णालय बदलापूर चे ३० खाटांवरुन ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्यास बृहत आराखडा शासन निर्णय दिनांक १७.०१.२०१३ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर श्रेणीवर्धीत रुग्णालयाच्या बांधकामाचे रु. १९५.८५ लक्ष इतक्या रक्कमेस शासन निर्णय दि. २२.०९.२०१७ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असून सन २०२१-२२ मध्ये रु. १६६.१७ लक्ष इतका निधी मंजूर असून सद्यस्थितीत ८० टक्के बांधकमा पुर्ण झालेले आहे.

ग्रामीण रुग्णालय मुरबाड चे ३० खाटांवरुन ५० खाटांमध्ये श्रेणीवर्धन करण्यातस बृहत आराखडा शासन निर्णय दि. १७.०१.२०१३ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

(३) पालघर जिल्हयातील २०० खाटांचे जव्हार रुग्णालयास निधी मंजूर असून पुढील कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सुरु आहे. ठाणे जिल्हयातील बदलापूरच्या श्रेणीवर्धीत रुग्णालयाच्या बांधकामास अनुदान उपलब्ध असून सद्यस्थितीत बांधकाम प्रगतीपथावर आहे. ग्रामीण रुग्णालय मुरबाडच्या बांधकामाचे सध्याच्या दरसूचीवर आधारित सुधारित अंदाजपत्रक व आराखडे आरोग्य सेवा आयुक्तालयाकडून मागविण्यात आले आहेत.

___

अकोला जिल्हयाच्या स्थानिक गुन्हे शाखेतील पोलिस ठाण्यात संशयीत आरोपीवर अनैसर्गिक लैंगिक अत्याचार व मारहाण झाल्याबाबत

(३७) ४०५६६ (०७-०४-२०२२). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयाच्या स्थानिक गुन्हे शाखेतील पोलिस ठाण्यात संशयीत आरोपीवर अनैसर्गिक लैंगिक अत्याचार करुन अमानुष मारहाण झाल्याची तक्रार शेगावच्या एका सराफा व्यापाऱ्याने दिनांक २७ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास पोलिस अधिक्षक, अकोला यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरिक्षक यांचे अधिनस्त असलेल्या सहायक पोलिस निरीक्षक (एपीआय) व हवालदारांनी सदर अत्याचार करण्यास दुस-या आरोपीस भाग पाडले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक यांच्या बेजबाबदारपणामुळे हा अमानुष प्रकार घडल्याने त्यांची चौकशी करुन त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (०६-०६-२०२२) : (१) दिनांक १८/०१/२०२२ रोजी तक्रार अर्ज प्राप्त झाला आहे.

(२) व (३)

या प्रकरणी उप विभागीय पोलीस अधिकारी, शहर विभाग, अकोला यांचेकडून करण्यात आलेल्या चौकशीमध्ये अत्याचार व अमानुष मारहाण झाल्याचे निष्पन्न झालेले नाही.

तथापि या प्रकरणातील चौकशीदरम्यान आढळलेल्या अन्य कसुरीच्या अनुषंगाने याप्रकरणी १ पोलीस अधिकारी व ६ पोलीस कर्मचारी यांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच सदर प्रकरणी संबंधित पोलीस निरीक्षक यांच्या हलगर्जीपणाबाबत कसुरी अहवाल तसेच, सहायक पोलीस निरीक्षक व पोलीस अंमलदार यांचेविरुध्द विभागीय चौकशी होणेबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक, अकोला कार्यालयामार्फतीने पोलीस उप महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचेकडे सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मेळघाट (जि. अमरावती) तालुक्यातील आदिवासी समाजाच्या शेतकऱ्यांच्या "मका पीक शेतमालाला" किमान हमीभाव देण्याबाबत

(३८) ४०६१४ (०९-०४-२०२२). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाट (जि. अमरावती) येथील आदिवासी विकास महामंडळाने मका पीकाची खरेदीस सुरूवात केली नसल्याने सद्य:स्थितीत व्यापारी आदिवासी विभागाच्या प्रशासनाकडून पूर्वीच्या

दराने म्हणजेच १००० ते १२०० रुपयांनी मका पीकाची खरेदी करीत असल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तदसंदर्भात लोकप्रतिनिधी यांनी आदिवासी विकास मंत्री तसेच प्रधान सचिव आदिवासी विभाग, कृषि व पणन यांच्याकडे दिनांक १५ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे निवेदन केले आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मेळघाट तालुक्यातील आदिवासी शेतकऱ्यांना मका पीक शेतमाल विकणे सोईचे व्हावे यासाठी आदिवासी विकास महामंडळाने आदिवासींच्या मका पीक शेतमालाला किमान रुपये १ हजार ८७० रुपये खरेदीचा हमीभाव देऊन मका पीक खरेदीस सुरूवात करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. के.सी.पाडवी (२२-०४-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) जिल्हाधिकारी, अमरावती यांनी मंजुर केलेल्या ८ खरेदी केंद्रावर ४२६ शेतक-यांकडून १९,२३२ क्विंटल भरडधान्य (मका) शासनाने ठरवून दिलेल्या हमीभाव रू.१८७०/- प्रमाणे आदिवासी विकास महामंडळाच्या धारणी प्रादेशिक कार्यालयाकडून खरेदी करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

वसई व पालघर येथील रुग्णालयांचे श्रेणीवर्धन करण्याबाबत

(३९) ४०६९१ (२४-०४-२०२२). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.विनोद निकोले (डहाणू) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई (जि.पालघर)येथे नवीन १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय स्थापन करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे तथापि तेथील रुग्णांच्या मानाने खाटांची संख्या अपुरी असल्या कारणाने खाटांची संख्या वाढविण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे एप्रिल, २०१७ मध्ये व त्यानंतरही वारंवार शासनाकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, पालघर ग्रामिण रुग्णालयाचे उपजिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि. १८ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास शासनास दिले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करुन मनुष्यबळाची उपलब्धता, आर्थिक अनुदान तसेच सी.एस. आर. दात्यांच्या विनंतीनुसार रुग्णालयाच्या नावात कमलाबेन रामनाथधुत शासकीय उपजिल्हा रुग्णालय, पालघर अशी मागणी केली आहे, हे ही खरेआहे काय,
(४) असल्यास, उक्त मागणींच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. राजेश टोपे (१३-०५-२०२२) : (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१२/प्र.क्र.१९२/१२/आरोग्य-३ दिनांक ०१ जून, २०१२ अन्वये महापुरुषांचे नाव देण्यामुळे भविष्यात कोणताही वाद उद्‌भवू नये यासाठी आरोग्य विभागाच्या अखत्यारितीतील आरोग्य संस्था व मालमत्तेला महापुरुषांचे नाव देण्यास मनाई करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला असल्यामुळे सदर रुग्णालयास सी.एस.आर.दात्याचे नाव देता येणे शक्य नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

किनवट (जि.नांदेड) तालुक्यातील अतिवृष्टी, पूरपरिस्थतीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबबात

(४०) ४०९७८ (२८-०३-२०२२). श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) किनवट (जि.नांदेड) तालुक्यातील सन २०२१ रोजी झालेल्या अतिवृष्टी, पूरपरिस्थतीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना भरपाई रक्कम शासनाने जाहिर करुन ती बँकेत जमा केली परंतू अदयापही शेतकरी नुकसान भरपाईच्या प्रतीक्षेत असल्याचे माहे जानेवारी,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विजय वडेट्टीवार (२९-०४-२०२२) : (१) हे खरे नाही, किनवट तालुक्यातील सर्व बाधीत शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर अनुदान जमा करण्यात आले आहे.
(२) विहित निकष पूर्ण करीत असलेल्या प्रकरणी शेतीपिकांच्या नुकसानीकरिता मदत देण्यात येते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात आदिवासी विभागाच्या निधीतून होणारी रस्त्याची कामे आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील करण्यात आल्याबाबत

(४१) ४१००४ (०९-०४-२०२२). श्रीमती मंजुळा गावीत (साक्री) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात आदिवासी विभागाच्या निधीतून होणारी रस्त्याची कामे आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर करण्यात आले असल्याचे निदर्शनास आल्यामुळे मागील ३ वर्षात सुमारे २६४ कोटी रुपयांची कामे रद्द करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्याअनुषंगाने उक्त रस्त्याची कामे करण्यास जबाबदार असलेल्या संबधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उपाययोजना क्षेत्राबाहेर करण्यात आलेल्या रस्त्यावर खर्च झालेली रक्कम शासन निर्णयानुसार वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

ॲड. के.सी.पाडवी (०९-०५-२०२२) : (१) अंशत: खरे आहे.

सन २०१९-२० ते २०२१-२२ या मागील ३ आर्थिक वर्षामध्ये आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील, अद्याप सुरु न झालेली, व्दिरुक्ती झालेली, जागेची अडचण, मंजूर असलेल्या किंमतीत काम करणे शक्य नसल्याने तसेच अन्य योजनेत मंजूर असलेली ईत्यादि कारणास्तव राज्यस्तर लेखाशिर्ष ५०५४ ५११७ अंतर्गत रु. ७७.८६ कोटी व लेखाशिर्ष ३०५४ २७२२ अंतर्गत रु. १६.१९ कोटी अशी एकूण रु.९४.०५ कोटी रकमेची रस्त्यांची कामे रद्द करण्यात आलेली आहेत.
(२) व (३) वित्त विभागामार्फत अर्थसंकल्पीय प्रकाशनामध्ये रस्ते व पुलांची कामे अंतर्भूत करण्याकरीता किंवा पुरवणी मागण्या सादर करण्याकरीता विभागांना निश्चित कालमर्यादा ठरवून देण्यात येते. तथापि, सदर कालमर्यादेच्या अंतिम क्षणापर्यत प्राप्त झालेली लोकप्रतिनिधींची निवेदने विचारात घेऊन रस्त्यांच्या कामांचा समावेश नवीन बाब अंतर्गत समाविष्ट करण्यासाठी प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात येतो. तथापि, अशा कामांची खातरजमा करता न आल्यामुळे सदरच्या कामांना आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये असल्याची खात्री करुन सुरु करण्याच्या अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येते.

प्रस्तुत कामांना प्रकल्प स्तरावरुन आदिवासी उपयोजना क्षेत्रात असल्याची खातरजमा करुन आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. तसेच, आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील कामांना निधी न देता सदरची कामे रद्द करण्यात येतात.
(४) प्रश्न उद्भवत नाहीत.

पुणे जिल्हयातील आरोग्य उपकेंद्र रायरी व पिसावरे (ता.भोर) व आरोग्य उपकेंद्र पानशेत (ता.वेल्हे) या रुग्णालयात अधिकारी व सेवकवर्ग उपलब्ध होण्याबाबत

(४२) ४१२०० (१२-०४-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर (जि.पुणे) तालुकयातील प्राथामिक आरोग्य केंद्र आंबवडे अंतर्गत आरोग्य उपकेंद्र रायरी व पिसावरे तसेच वेल्हे तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र करंजावणे अंतर्गत आरोग्य उपकेंद्र दापोडे येथे नवीन उपकेंद्राच्या इमारतीचे काम पूर्ण झले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, मात्र याठिकाणी अधिकारी व कर्मचारीवर्ग नसल्याने अद्यापि सदर केंद्रे सुरु झालेली नाहीत, हेही खरे आहे काय
(३) तसेच, भोर (जि.पुणे) तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, भुंतोंडे येथे नवीन इमारतीचे काम पूर्ण झाले असून सदर ठिकाणी अधिकारी व सेवकवर्ग नसल्याने अद्यापि सदर केंद्र सुरु होवू शकलेले नाही, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन त्याबाबत निर्णय घेवून येथे विविध संवर्गानुसार अधिकारी व कर्मचारी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

श्री. राजेश टोपे (०७-०६-२०२२) : (१) व (२) उपकेंद्र रायरी, उपकेंद्र पिसावरी ता.भोर जि.पुणे येथील इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून दिनांक ०७, जून २०२१ च्या शासन निर्णयान्वये सदर संस्थेमध्ये पदनिर्मिती करण्यात आली आहे. सदर संस्थांत पदभरतीबाबतची कार्यवाही ग्राम विकास विभागामार्फत सुरु आहे. तसेच उपकेंद्र दापोडे ता.वेल्हे जि.पुणे येथील इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून तेथील पदनिर्मितीबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) व (४) प्राथमिक आरोग्य केंद्र भुतोंडे येथील इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून सदर ठिकाणच्या पदनिर्मितीबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

हिंगणघाट येथे प्रलंबित असलेले अतिरिक्त ग्रामीण पोलीस स्टेशन निर्माण करण्याबाबत

(४३) ४१३२४ (०७-०४-२०२२). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगणघाट शहराची लोकसंख्या १ लाख १५ हजार आहे तसेच अतिरिक्त ५० गावे या पोलीस स्टेशनला जोडली असून गुन्हेगारीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी वाढती गुन्हेगारी पाहता हिंगणघाट येथील ग्रामीण पोलीस स्टेशनचा प्रस्ताव शासनाने अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने अतिरिक्त ग्रामीण पोलीस स्टेशन निर्माण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (१३-०६-२०२२) : (१) हिगणघाट शहराची लोकसंख्या १,५३,०७१ इतकी असून, ५९ गांवे या पोलीस ठाण्यास जोडली असून, गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे.
(२) व (३)

राज्यात दुसऱ्या टप्प्यात हिंगणघाट पोलीस ठाणेचे विभाजन करून नवीन पोलीस ठाणे निर्माण करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

पोलीस अधीक्षक, वर्धा यांनी दि.७/३/२०२२ रोजीच्या पत्राव्दारे पोलीस महासंचालक कार्यालयास प्रस्ताव सादर केला. परंतु, त्यामध्ये काही त्रुटी असल्याने, त्यांची पूर्तता करणेबाबत पोलीस महासंचालक कार्यालयाने पोलीस अधीक्षक, वर्धा यांना दि.२०/४/२०२२ च्या पत्राव्दारे कळविण्यात आलेले आहे.त्रुटींची पुर्तता होवून, प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर वित्त विभागाच्या अभिप्रायानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मांजरसुंबा (जि.बीड) महसुल मंडळामध्ये माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०२१ रोजी झालेल्या अतिवृष्टीत नुकसान झालेल्यांना नुकसानभरपाई देण्याबाबत

(४४) ४१३८५ (२८-०३-२०२२). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्हयातील मांजरसुंबा महसुल मंडळामध्ये ७ हजार १४८ हेक्टर क्षेत्रातील पिकांचे माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसान झाल्याचे क्षेत्रिय पंचनाम्याच्या प्रशासकीय स्तरावर नियमानुसार दिलेल्या अहवालात नमूद करण्यांत आले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महसूल व वन विभागाच्या दि. २६ ऑक्टोबर, २०२१ च्या शासन निर्णयामध्ये, फक्त अतिवृष्टी झालेल्या ६५ मिलीपेक्षा जास्त पाऊस ज्या महसूल मंडळात झालेला आहे त्या महसूल मंडळास शासकीय अनुदान वितरीत करण्याचे आदेशित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मांजरसुंबा (ता. जि. बीड) या महसूल मंडळाला दि. १ सप्टेंबर ते ८ सप्टेंबर व दि. २१ ते २६ सप्टेंबर, २०२१ या कालावधीत ३८१ एम.एम. म्हणजेच सरासरीच्या २०० टक्के इतकी पावसाची नोंद झाली असून पंचनाम्याअंती पिकांचे नुकसान देखील झालेले असतांना महसूल मंडळाच्या यादीतून मांजरसुंबा या महसूल मंडळास वगळण्यात आले असल्याने या मंडळास अद्याप पर्यंत शासकीय अनुदान वितरीत करण्यात आले नसल्याचे दिनांक २८ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त परिपत्रकाच्या अनुषंगाने मांजरसुंबा महसुल मंडळास अन्य महसूल मंडळांप्रमाणेच शासकीय अनुदान वितरित करण्यांत यावे, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी (ता. बीड) यांनी जिल्हाधिकारी बीड, विभागीय आयुक्त औरंगाबाद तसेच मदत व पुनर्वसन मंत्री यांचेकडे दि. २७ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये केली असून त्याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली अथवा करण्यांत येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विजय वडेट्टीवार (२७-०४-२०२२) : (१) खरे नाही,
(२) हे खरे आहे, प्रचलित निकषानुसार २४ तासात ६५ मि.मी.पेक्षा जास्त व ३३% पेक्षा जास्त शेतीपिकांचे नुकसान झाल्यास विहित दराने मदत अनुज्ञेय ठरते.
(३) खरे नाही,

बीड जिल्हयामध्ये जून ते ऑक्टोबर, २०२१ मध्ये अतिवृष्टीमध्ये मांजरसुंबा महसूल मंडळात २४ तासात ६५ मि.मी. पेक्षा जास्त पाऊस झालेला नाही. त्यामुळे निकषाची पूर्तता देय नसल्याने शेतीपिकांच्या नुकसानीकरिता मदत अनुज्ञेय नाही.
(४) व (५) प्रश्न क्रमांक ३ ला दिलेल्या उत्तराच्या अनुषंगाने प्रश्न उद्‌भवत नाही,

---

पिरबुरहाण नगर (जि.नांदेड) येथे अंगणवाडी बालकांना प्लास्टिक तांदूळ देण्यात आल्याबाबत.

(४५) ४१९७० (१२-०४-२०२२). श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिरबुरहाण नगर (जि.नांदेड) येथे अंगणवाडी बालकांना देण्यात येणाऱ्या मोफत पोषण आहारात प्लास्टिक तांदूळ आढळल्याची बाब दिनांक ७ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महिला व बालविकास विभागाच्या एकात्मिक बालविकास सेवा योजने अंतर्गत अंगणवाडीतील बालकांना दिल्या जाणाऱ्या पोषण आहार पाकिटावर कोणते ही बॅच क्रमांक, पॅकिंग दिनांक तसेच कालबाहय तारखेची (एक्सपायरी डेट) यांची नोंद नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या पुर्वीही जिल्हयामध्ये पोषण आहार वाटप करताना प्लास्टिक तांदूळ दिले गेले असल्याच्या तक्रारी पालकांनी जिल्हा परिषद प्रशासना कडे दिल्या होत्या त्या अनुषंगाने चोकशी करून संबधितांना क्लीन चीट देण्यात आली असून त्यामागची कारणे काय आहे,
(४) असल्यास, याबबात शासनाने चौकशी केली आहे काय, तदनुसार कोणती
कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (०२-०६-२०२२) : (१) हे खरे नाही,
एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत फोर्टिफाईड तांदुळ पुरवठा करण्यात येतो व सदरचा फोर्टिफाईड तांदुळ केंद्र शासनाच्या गहू अधारीत पोषण कार्यक्रम (Wheat Based Nutrition Program) अंतर्गत पुरविण्यात येतो. दि.०७.०२.२०२२ रोजी लोकमत वृत्तपत्रात गैरसमजुतीतून प्लास्टीक तांदुळ पुरवठयाबाबतची बातमी प्रसिध्द झाली होती. त्यानंतर दि.०९.०२.२०२२ रोजी संबंधीत वृत्तपत्राने सदर तांदुळ प्लास्टीक नसून पौष्टीक व फोर्टिफाईड असल्याबाबत बातमी प्रसिध्द केली होती.
(२) हे खरे नाही.
पोषण आहार पुरवठा केल्या जाणाऱ्या प्रत्येक पाकीटावर धान्याचे वजन, बॅच नंबर, उत्पादकाचे नाव, उत्पादन दिनांक व अंतिम तारीख याची अचुकपणे नोंद केलेली असते.
(३) व (४) पोषण आहारामध्ये दिला जाणारा तांदुळ हा प्लॉस्टीक तांदुळ नसून फोर्टिफाईड तांदुळ आहे. तथापि, सदर तांदुळ प्लॉस्टीक सारखा दिसत असल्यामुळे गैरसमज होतो. सदर बाबतीत आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांनी जिल्हा कार्यक्रम

अधिकारी व बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) यांना फोर्टिफाईड तांदुळाबाबत अंगणवाडी सेविका व मदतनिस तसेच लाभार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्याबाबत निर्देश दिले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

महिला वर्गाचे कोरोना लसीकरण जलदगतीने होणेबाबत.

(४६) ४२२१७ (१२-०४-२०२२). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोना लसीकरणाच्या लाभार्थ्यांमध्ये महिलांचे प्रमाण पुरूषांच्या तुलनेत कमी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोरोनाच्या पहिल्या व दुसऱ्या लाटेत महिलांना कोरोना संसर्गाची लागण २७ ते ३० टक्के होती व त्या अनुषंगाने गेल्या काही महिन्यांमध्ये या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महिलांचे लसीकरण जलदगतीने होणेबाबत शासनाने कोणते धोरण अवलंबले आहे,
(४) नसल्यास, विलंबाचे कारण काय आहे ?

श्री. राजेश टोपे (१३-०६-२०२२) : (१) हे खरे आहे.
दि.२० एप्रिल २०२२ रोजी राज्यात एकूण १६,३३,४७,१३६ डोसेस देण्यात आले. त्यापैकी ८,६८,७१,७२९ डोसेस पुरुषांना देण्यात आले व ७,६४,४०,२०२ डोसेस स्त्रीयांना देण्यात आले.
(२) कोरोनाच्या पहिल्या व दुस-या लाटेत महिलांना कोरोना संसर्गाची लागण खालीलप्रमाणे होती.

कालावधी	एकूण कोरोना रूग्ण	एकूण महिला कारोना रूग्ण	टक्केवारी
पहिली लाट (मार्च, २०२० ते डिसेंबर, २०२०)	१९,४५,१७८	७,४०,६९४	३८.१
दुसरी लाट (जानेवारी, २०२१ ते डिसेंबर, २०२१)	४७,६२,९५५	२१,७६,५५८	४५.७
सद्यस्थिती (जानेवारी, २०२२ ते एप्रिल २०२२)	११,९५,०८३	४,६७,६६४	३९.१

(३) राज्यात कोविड १९ लसीकरण महिलांमध्ये तसेच सर्व वयोगटात जलदगतीने पूर्ण होण्यासाठी खालील प्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहे -
• कोविड १९ लसीकरण कमी असलेल्या गावांनी वॉर्डाची यादी करुन प्राधान्याने अशा गावातील लसीकरण सत्रांचे आयोजन.
• जिल्हा/मनपा/तालुकास्तरावर टास्क फोर्स बैठकांचे आयोजन
• सुक्ष्मकृती नियोजन आराखडयाच्या मदतीने लसीकरण सत्रांचे आयोजन व अंमलबजावणी.
• घरोघरी एएनएम, एमपीडब्ल्यू, आशा कार्यकर्ती,
अंगणवाडी कार्यकर्ती यांच्याद्‌वारे घरभेटी देऊन

कोविड लसीकरणासाठी पाठपुरावा.
• लसीकरण सत्रांची संख्या वाढविणे तसेच
लाभार्थ्यांसाठी सत्रांचे आयोजन सोईच्यावेळी करणे.
• कोविन प्रणालीचा सहायाने डयूलिस्टचा वापर
(लाभार्थ्यांची यादी दुसरा डोस राहिलेल्या)
• लाभार्थ्यांना लसीकरण सत्राच्या ठिकाणी
नेण्यासाठी वाहतूकीची सोय करणे.
• व्यापक प्रमाणात लसीकरणाची प्रसिध्दी करणे तसेच
सोशल मिडीयाचा वापर करुन जास्तीत जास्त
लाभार्थ्यांना लसीकरणासाठी प्रवृत्त करणे.
• इतर शासकीय विभागांचा कोविड लसीकरणात सक्रिय सहभाग.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मौ.रोहणा (ता.आर्वी, जि.वर्धा) येथील पोलीस चौकीचे रुपांतर पोलीस स्टेशनमध्ये करण्याबाबत

(४७) ४३६३७ (१२-०४-२०२२). श्री.दादाराव केचे (आर्वी) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौ.रोहणा (ता.आर्वी, जि.वर्धा) येथे आर्वी विधानसभा मतदार क्षेत्रातील पोलीस चौकी स्थापित असून पोलीस स्टेशन पुलगांवचे कार्यक्षेत्रात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गावाच्या परिसरातील खरांगणा व आर्वी पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रात येत असल्यामुळे तेथील नागरिकांना तक्रार देण्याकरिता १५ ते २० कि.मी. अंतर दूर जावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी सदर पोलीस स्टेशन निर्माण करुन रोहणा पोलीस स्टेशनला जोडल्यास तेथील होणाऱ्या अवैध गैरकारभारास आळा बसून पोलीस चौकीचे रुपांतर पोलीस स्टेशनमध्ये करण्यास मंजुरी देणार आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (१३-०६-२०२२) : (१) होय.
पुलगांव पोलीस ठाण्याच्या अंतर्गत दूरक्षेत्र रोहणा कार्यरत आहे.
(२) होय.
या परिसरात गुन्हयांचे प्रमाण फार कमी आहे.
(३) व (४)
पोलीस ठाणे निर्मितीचे निकष विचारात घेता, याठिकाणी दूरक्षेत्र रोहणा चे पोलीस ठाणेमध्ये रुपांतर करण्याची आवश्यकता नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

चंद्रपूर जिल्हयात निराधार योजनेच्या लाभार्थीकडून हयातीचा दाखला दिल्यानंतरही जिवंत असल्याचा पुरावा मागत असल्याबाबत.

(४८) ४३७४४ (०९-०४-२०२२). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील नागरिकांना शासनाकडून देण्यात येणा-या निराधार योजनेचा लाभ घेत असताना हयातीचा दाखल्यासोबत जिवंत आहात हे शासकीय कार्यालयात प्रत्यक्ष हजर राहून सिध्द् करावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ?

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन येथील सदरील सिध्द्तेची पध्द्त तातडीने बंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. धनंजय मुंडे (२९-०४-२०२२) : (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

उस्मानाबाद जिल्हयात जिल्हा प्रशासनाने रस्त्यावर फिरणाऱ्या बालकांचे केलेले सर्वेक्षण

(४९) ४३७४५ (२४-०४-२०२२). डॉ.तानाजी सावंत (परांडा) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशान्वये रस्त्यावर फिरणा-या बालकांचे सर्वेक्षण केले असता जिल्हयात फक्त ३७ बालकेच रस्त्यावर फिरत असल्याचा अहवाल जिल्हा प्रशासनाने दिल्याची बाब माहे फेब्रूवारी २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयातील उमरगा, तुळजापूर,उस्मानाबाद,कळंब आदी ठिकाणी रस्त्यावर व मंदीरात फिरत असलेल्या बालकावर पोलिस प्रशासनाने वेळोवेळी कार्यवाही कलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, असे असताना महिला व बाल विकास अधिका-यांनी फक्त ३७ बालके रस्त्यावर फिरत असल्याचा दिलेला अहवाल संशयात्मक असल्याची शंका निर्माण होत असल्यामुळे या अहवालाची पडताळणी शासन स्तरावरुन केलेली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार यामध्ये दोषी असण्या-या संबधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (०१-०६-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

उस्मानाबाद जिल्हयातील तीर्थक्षेत्र असणाऱ्या तुळजापूर शहरात जिल्हा महिला व बाल विकास

अधिकारी कार्यालय, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, बाल कल्याण समिती, पोलीस विभाग, तुळजापूर मंदीर प्रशासन यांच्या संयुक्त विद्‌यमाने रस्त्यावर फिरणाऱ्या बालकांना (बाल भिक्षेकरी) ताब्यात घेण्याबाबत सन २०१९ पासून कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) याबाबत राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग व राज्य शासनाच्या स्तरावर नियमितपणे आढावा घेण्यात येतो व त्याची पडताळणी करण्यात येते. रस्त्यावरील बालकांबाबत करावयाची कार्यवाही ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. जिल्हयातील रस्त्यावरील बालके शोधण्याचे व त्यांचे योग्य पुनर्वसन करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

विले पार्ले (मुंबई) येथील विधानसभा क्षेत्रात बसविण्यात आलेले सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बंद अवस्थेत असल्याबाबत

(५०) ४३७७७ (०७-०४-२०२२). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विले पार्ले (मुंबई) येथील विधानसभा क्षेत्रात बसविण्यात आलेले बहुतांश सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बंद अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे गुन्हेगारांची ओळख पटविणे तसेच गुन्हयांचा तपास होण्यास अडचण निर्माण झाल्यामुळे विभागातील गुन्हयांच्या संख्येत वाढ झाल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर क्षेत्रात दुसऱ्या टप्प्यात बसविण्यात येणाऱ्या सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे समजते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त विधानसभा क्षेत्रातील बंद अवस्थेत असलेल्या सी.सी.टी.व्ही. कॅमेरांची दुरुस्ती व देखभालीची वारंवारिता ठरवून दुसऱ्या टप्प्यातील सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील (१३-०६-२०२२) : (१) व (२) मुंबईतील विलेपार्ले विधानसभा क्षेत्रांतर्गत सांताक्रुझ, जुहू, सहार व विलेपार्ले या चार पोलीस ठाण्यांचा समावेश होत असून या चार पोलीस ठाणे अंतर्गत एकुण २२६ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असुन त्यापैकी २१८ सीसीटीव्ही कॅमेरे चालू स्थितीत आहेत. ८ कॅमेरे Fiber Cut मुळे बंद असून ते दुरुस्त करण्यात येत आहे. गुन्हयांच्या संख्येत वाढ झालेली नाही.
(३) बृहन्मुंबई शहरामध्ये दुसऱ्या टप्प्याचे काम जून २०१९ पासून सुरु झाले असून एकूण ५८३५ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांपैकी ३०८० सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. उर्वरित सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी केबल जोडणीकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून खोदकामासाठी (Trenching) परवानगी घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) विलेपार्ले विधानसभा क्षेत्रात एकूण ८ सीसीटीव्ही कॅमेरे Third party dependency (Fiber Cut) मुळे बंद असून ते दुरुस्त करण्यात येत आहेत. तसेच बृहन्मुंबई शहरामधील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची दुरुस्ती व देखभाल नियमितपणे केली जाते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

विधान भवन : | **राजेन्द्र भागवत**
मुंबई. | **प्रधान सचिव,**
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.